मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » शनिवार, २६ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:१२८ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## काश्मिरी युवकाच्या कुटुंबाला शिंदेकडून पाच लाखांची मदत

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला होत असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पर्यटकांच्या रक्षणासाठी धावून जाणारा सय्यद आदिल हुसैन शाह या अवघ्या २० वर्षांच्या स्थानिक युवकाचा देखील दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. माणुसकी दाखवत धाडसाने दहशतवाद्यांना सामोरे जाणाऱ्या सय्यदच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त करतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरित्या सय्यदच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांची मदत केली आहे. पहलगाम येथे मदतीसाठी गेलेले शिवसेना कार्यकर्ते व सरहद संस्थेचे पदाधिकारी यांच्या माध्यमातून सय्यदच्या कुटुंबियांना धनादेश देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सय्यदच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

अग्राग्रलेख

खरीखरी

## सावरकर जुनेच, गांधी नवे !

आज सर्वोच्च न्यायालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बाबतीत राहुल गांधी यांनी जे वारंवार उद्गार काढले होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांनी चांगले ताशेरे ओढलेले आहेत. सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, महात्मा गांधी यांनी सावरकरांना लिहिलेल्या पत्रात स्वतःचा उल्लेख 'आपला विश्वासू सेवक' असा केलेला होता. सध्याच्या कालखंडात राहुल गांधी हे नवे गांधी आहेत. मध्यंतरी त्यांच्या आज्जी इंदिरा गांधी, तर वडील राजीव गांधी यांनी सावरकरांबद्दल आदर व्यक्त केला होता. आपल्या 'भारत जोडो' यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात तरी स्वातंत्र्यवीर सावरकरांचा मुद्दा उकरू नये. असे आम्ही याच 'खरीखरी स्तंभात हेच खरेखरे' अगदी स्पष्टपणे लिहिले होते. तेव्हा आम्ही म्हटले होते, की सावरकर यांचा पूर्वार्ध प्रखर देशभक्तीपूर्ण होता. त्यांना दुहेरी जन्मठेप झालेली होती. त्यामुळेच जरा काही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. समजा अंदमानच्या कोठडीत मरणयातना सहन केल्यानंतर त्यांनी काही पत्रे लिहिलेली असतील. तर त्याचे भांडवल करून सावरकरांच्या पूर्वार्ध काळात त्यांनी केलेले महनीय कार्य विसरता येणे शक्य नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडमध्ये शिकायला गेल्यावर त्यांना प्रखर देशभक्त शामजी कृष्ण वर्मा यांची मदत झाली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च देहदंडाची म्हणजे सर्वाधिक शारीरिक यातनांची शिक्षा भोगणारे सावरकरच होते. हे सर्वांनी मान्य केलेच पाहिजे. यामुळे सावरकरांच्या नावाला केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात आदराने उच्चारले जाते. राहुल गांधी यांनी सावरकरांवर बोलणे टाळले पाहिजे. असे आम्ही तेव्हाही लिहिले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या कविता देशासाठी सर्वस्व अर्पण केल्यानंतर त्या कवितांमधून जे लिहिले होते. ते प्रखर देशभक्तीचे उदाहरण होते. ते आपल्या रचनेत काय काय म्हणाले होते,

" हे काय बंधू असतो जरी सात आम्ही।
स्वस्थंडिलीच दिधले असते बळी मी।।"

याचा सरळ अर्थ असा आहे की, जर आम्ही सात भावंडे असतो. तरी मातृभूमीसाठी मी बलिदान केले असते. सावरकरांनी अंदमानच्या कोठडीत ज्या यातना सहन केल्या. त्या अत्यंत क्रूर पद्धतीच्या शिक्षा आणि यातनांना सामोरे जाणे सामान्य माणसांना अजिबात शक्य नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी अशा प्रकारचे भडकावू विधान करण्याची काय गरज होती? असा अगदी परखड आणि सुस्पष्ट सवाल केला. याउपर यापुढे राहुल गांधी यांनी अशी विधाने केली. तर आम्ही स्वतः त्याची दखल घेऊ. असे न्यायमूर्तींनी विशेष करून म्हटलेले आहे. आजच्या घडीला स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या देशभक्तांची यादी तयार केली. तर सावरकरांचे नाव निश्चितच अत्यंत वरच्या स्थानी येईल. सावरकरांचे हिंदुत्वही अत्यंत वेगळे होते. त्यांचे रोखठोक विचार अनेक हिंदुत्ववाद्यांनाही पचतील असे नव्हते. पण स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या उत्तरार्धातील काही वक्तव्यांच्या बद्दल किंवा धर्माबद्दलच्या विधानांवर काही आक्षेप असू शकतात. पण त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर हे नाव कधीच खाली येऊ शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधी यांच्यावरील कारवाईला स्थगिती दिलेली आहे. मात्र स्थगिती देताना गांधी यांच्या वकीलांना ज्या प्रकारे न्यायालयाने धारेवर धरले. त्यावरून स्वातंत्र्यवीर सावरकरांचे महत्त्व आपोआपच प्रतिपादित होते. राहुल गांधी यांनी वारंवार अशा प्रकारे सावरकर यांचा अपमान करणे. अनेकांना पचेल असे अजिबात वाटत नाही. सावरकर हे नाव भारताच्या स्वातंत्र्य संग्रामलढ्यात निश्चितच गौरवाने उच्चारले जाते. त्यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील काही विधानांचे उल्लेख टाळले. तर स्वातंत्र्यवीर सावरकर त्यांचे महत्त्व आणि त्यांचे महात्म्य सांगण्याची गरजच नाही. आता सर्वोच्च न्यायालयानेच दणका दिल्यामुळे राहुल गांधी या पुढे तरी स्वातंत्र्यवीरांच्या बाबतीत बोलताना योग्य ती खबरदारी बाळगून असा प्रकार पुन्हा होणार नाही. याची खात्रीपूर्वक सावधगिरी घेतील. असा आमचा कयास आहे. परमेश्वर राहुल गांधींना सद्बुद्धी देवो!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# सावरकरांबाबत वक्तव्यावरून राहुल गांधींना फटकारले

## सुप्रीम कोर्ट म्हणाले- तुमच्या आजीनेही त्यांचे कौतूक केले होते...

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

लोकसभेचे विरोधी पक्षनेते, काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यावरून सर्वोच्च न्यायालायने गुरूवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. स्वातंत्र्यसैनिकांविषयी टिपण्णी करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

अशा वक्तव्यांची पुनरावृत्ती झाल्यास स्वतःहून कारवाई केली जाईल, असा इशाराही सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच तुमच्या आजी (माजी पंतप्रधान इंदिरा गांधी) या सावरकरांचे कौतूक करत होत्या, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

सावरकर यांच्याविषयी कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका आदेशामध्ये राहुल गांधींविरूद्धचे समन्स रद्द करण्यास नकार दिला होता. त्याला राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

त्याविषयी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठाने ही सुनावणी घेतली.

राहुल गांधींनी १७ नोव्हेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील एका सभेत सावरकरांविषयी आक्षेपार्ह व्यक्त केले होते. राहुल गांधी यांनी सावरकरांना "ब्रिटिशांचे नोकर" असे संबोधले होते आणि सावरकर ब्रिटिश सरकारकडून पेन्शन घेत होते, असे म्हटले होते.



राहुल गांधी यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, या विधानामागे द्वेष पसरवण्याचा कोणताही हेतू नव्हता. मात्र, खंडपीठाने गंभीर नाराजी व्यक्त करत म्हटले, "तुमचे क्लायंट जाणतात का की महात्मा गांधींनीसुद्धा सावरकरांबाबत 'तुमचा विश्वासू सेवक' असा शब्दप्रयोग केला होता?

त्यांना माहित आहे का की त्यांच्या आजीनेही (इंदिरा गांधींनी) सावरकरांना पत्र पाठवून त्यांचे कौतुक केले होते?"

न्यायालयाने काँग्रेस खासदाराला अशा विधानांपासून दूर राहण्याचा स्पष्ट सल्ला दिला. "तुम्ही एक राजकीय नेते आहात. मग अशा प्रकारची वक्तव्ये का करायची? करू नका. जर हेतू भडकावण्याचा नव्हता, तर असे विधान करण्याची गरजच काय?" असा सवाल खंडपीठाने केला.

सर्वोच्च न्यायालयाने अद्याप कारवाईवर स्थगिती दिली असली, तरी गांधींनी अशा प्रकारची वक्तव्ये पुन्हा करु नयेत, हे स्पष्ट केले. "हे लक्षात ठेवा – पुढे असे विधान झाले, तर आम्ही स्वतःहून कारवाई करू. आम्ही कोणालाही आमच्या स्वातंत्र्यसैनिकांबद्दल अशा प्रकारे बोलू देणार नाही," असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला.

खंडपीठाने हेही अधोरेखित केले की, राहुल गांधींनी हे विधान महाराष्ट्रातील अकोला येथे केले होते – जिथे सावरकरांचे विशेष महत्त्व आहे. अधिवक्ता नृपेन्द्र पांडे यांनी तक्रार दाखल करत गांधींवर भाषणात मुद्दाम सावरकरांचा अपमान केल्याचा आरोप केला आहे. तक्रारीत असेही म्हटले आहे की, सावरकरांची बदनामी करण्याचा हा एक नियोजित कट होता.

## 'ते पुन्हा एकत्र येण्याची सध्या कुठलीही परिस्थिती नाही'

### फडणवीसांचे पवार, ठाकरे बंधूंबद्दल भाष्य



**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

राज ठाकरेंनी साद दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला. शरद पवार आणि अजित पवार बैठकीच्या निमित्ताने भेटताना दिसले आणि राज्यात पुन्हा चर्चांना उधाण आले. ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरू झाली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंच्या विधानांचे वेगवेगळे अर्थ लावले जात आहेत. याच सगळ्या राजकीय परिस्थितीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात मुलाखत झाली. यावेळी त्यांना ठाकरे बंधू आणि पवार काका-पुतण्या यांच्या पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतांबद्दल प्रश्न विचारण्यात आला.

राज्यात पुन्हा काही राजकीय आघाड्या होताना तुम्हाला दिसत आहेत का? कारण दोन-तीन दिवसांपूर्वी आपण बघितलं की, राज ठाकरेंना उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला. पुण्यात शरद पवार-अजित पवार भेटले. हे राजकीय आघाडी होतंय तुम्हाला दिसत आहे का? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारण्यात आला.

प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "माझी पहिली भूमिका कुठलेही परिवार एक होत असतील, तर आम्हाला त्याची अडचण नाही. त्यांनी जरूर एकत्रित यावं. आम्ही त्यांच्या एकत्रित येण्याचं स्वागत करू."

"दुसरं, माध्यमे फार जास्त ऐकतात. फार जास्त विचार करतात आणि फार जास्त संदर्भ काढतात. दोन वाक्यांमधील अर्थ काढणं, हे जेवढं तुम्ही करता. मला असं वाटतं की, फार पुढचा विचार तो असतो. आतातरी मी स्पष्टपणे सांगतो. काय जे चाललेलं असेल... आतातरी अशा प्रकारच्या रिअलाईमेंटची मला कुठलीही परिस्थिती दिसत नाही. अर्थात साद आणि प्रतिसाद ज्यांनी दिला, असं तुम्ही म्हणत आहात. ते याबद्दल अधिक सांगू शकतील. मी त्याबद्दल अधिक सांगणं योग्य नाही. त्यामुळे हा मुद्दा तुम्ही त्यांनाच विचारा", असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

"तुम्ही एक लक्षात ठेवा, जे तुम्ही करता (अर्थ काढता) ते कधीच होत नाही. एवढा तर तुम्ही अनुभव घ्या २०१९ पासूनचा", असा चिमटा मुख्यमंत्री फडणवीस यांनी काढला.

## फडणवीसांना 'मी पुन्हा येईन' विषयावर पुस्तक लिहायला लावणार- अजितदादांची फटकेबाजी

**पुणे, दि. २५ प्रतिनिधी**

२०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी 'मी पुन्हा येईन'चा नारा दिला होता. त्यानंतर महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर फडणवीस यांनी 'मी पुन्हा अडीच वर्षांनी आलो, दोन पक्ष फोडूनच आलो', असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याची त्यावेळी जोरदार चर्चा झाली होती. आता मुख्यमंत्री फडणवीस यांच्या या घोषणेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यातील एका कार्यक्रमात जोरदार फटकेबाजी केली.

'मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन' हे पुस्तक मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहायला लावणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात 'ऐकलत का?' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या



कार्यक्रमात अजित पवार यांनी काही जुने किस्से सांगितले. त्यात त्यांनी 'मी पुन्हा येईन' या फडणवीसांच्या घोषणेचाही उल्लेख केला.

अजित पवार यांनी एक जुना किस्सा सांगितला. 'मी भाषण करायला उठलो. पण घाम फुटला होता. पण मी म्हटले साहेब एवढे बोलतात आपण बोलू. काय व्हायच ते होऊ दे, नंतर तुम्ही आजपर्यंत मला पाहत आहात. भाषण टाळ्यांसाठी नको. तर ते मनाचा ठाव घेणारे हवे,' असे अजित पवार म्हणाले.

यावेळी बोलताना कवी, लेखक रामदास फुटाणे म्हणाले की, पवार कुटुंब आणि ठाकरे कुटुंब यांच्या भोवती महाराष्ट्राचे राजकारण फिरत आहे. हे दोन्ही कुटुंब एकत्र यावीत, ही महाराष्ट्राची इच्छा आहे. दादा खूप काम करतात, दादा अशीच वेळ साहित्य संमेलनालादेखील द्यावी. साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमातदेखील येत जावे. राजकारण तर काय रोजचे आहे, अशी साद कवी रामदास फुटाणे यांनी त्यांच्या भाषणातून दादांना घातली. या कार्यक्रमाला शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे माजी आमदार अशोक पवारही उपस्थित होते.

## हल्ल्यावेळी पहलगाममध्ये सैनिक नव्हते यावर सरकारचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर गुरुवारी संध्याकाळी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधकांनी केंद्र सरकारला थेट आणि कठोर प्रश्न विचारले.

बैठकीत विरोधकांचा मुख्य रोख हल्ला ज्या बैसरण या पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेल्या खोऱ्याबाबत झाला, त्या ठिकाणी सुरक्षादलांची उपस्थिती का नव्हती यावर होता. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हा मुद्दा उपस्थित केला, आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंग यांच्यासह अनेकांनी त्याला पाठिंबा दिला. त्यावर सरकारने स्पष्टीकरण दिले आहे.

सर्वपक्षीय बैठक संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याआधीच भारत सरकारने पाकिस्तानविरोधात काही कठोर प्रत्युत्तरात्मक उपाययोजना जाहीर केल्या होत्या.

या उपाययोजनांमध्ये पाकिस्तानशी राजनैतिक संबंध खालच्या स्तरावर नेणे, पाकिस्तानी लष्करी अधिकाऱ्यांना देशाबाहेर काढणे, १९६० मधील सिंधू नदी पाणी करार थांबवणे, आणि वाघा-अटारी सीमेवरील स्थलांतर बंद करणे यांचा समावेश होता.

विरोधकांच्या प्रश्नावर केंद्र सरकारने स्पष्टीकरण दिले की, बैसरण परिसर दरवर्षी जूनमध्ये सुरु होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेसाठी बंदोबस्ताखाली घेतला जातो. त्यावेळी अधिकृतपणे मार्ग खुले केले जातात आणि यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी सुरक्षा दल तैनात केले जातात.

सरकारच्या म्हणण्यानुसार, स्थानिक टूर ऑपरेटरनी २० एप्रिलपासूनच पर्यटकांना त्या भागात नेणे सुरू केले होते, जेव्हा यात्रा हंगामासाठी आवश्यक सुरक्षा यंत्रणा अद्याप सक्रिय झालेली नव्हती. स्थानिक प्रशासनालाही पर्यटकांची ही आगाऊ आवक माहिती नव्हती, त्यामुळे सुरक्षा तैनात करण्यात आली नव्हती.

विरोधकांनी आणखी एक प्रश्न उपस्थित केला होता. भारताकडे पाणी साठवण क्षमता नसताना, सिंधू जल करार का स्थगित करण्यात आला?

त्यावर केंद्र सरकारचे उत्तर होते की, हा निर्णय तात्काळ परिणामासाठी नसून एक प्रतीकात्मक आणि धोरणात्मक संदेश देण्यासाठी होता.

सरकारने स्पष्ट केले, "हा करार थांबवण्यामागचा हेतू म्हणजे सरकार कारवाईसंदर्भात किती गंभीर आहे हे दाखवणे. हा निर्णय एक स्पष्ट संदेश देतो की भविष्यात सरकारची भूमिका काय असेल."

## राहुल गांधींनी श्रीनगरमध्ये घेतली हल्ल्यातील जखमींची भेट

**श्रीनगर, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज श्रीनगरमध्ये दाखल झाले आहेत. श्रीनगरमध्ये बोलताना राहुल गांधी म्हणाले की, "दहशतवाद्यांनी जे करण्याचा प्रयत्न केला होता, तो हाणून पाडण्यासाठी प्रत्येक भारतीयाने एकजूट राहणे खूप महत्वाचे आहे. काही लोक काश्मीर आणि देशातील माझ्या बंधू आणि भगिनींवर हल्ला करत आहेत हे पाहून दुःख होते. आपण सर्वांनी



एकत्र येत या घृणास्पद कृतीशी लढणे आणि दहशतवादाला कायमचे पराभूत करणे खूप महत्वाचे आहे. मी मुख्यमंत्री आणि उपराज्यपालांनाही भेटलो आणि त्यांनी मला घडलेल्या घटनेची माहिती दिली. मी दोघांनाही आश्वासन दिले की, आमचा पक्ष आणि मी या प्रकरणात त्यांना पूर्ण पाठिंबा देणार आहोत." त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील जखमी आणि बळींच्या कुटुंबियांची भेट घेतली. त्यांनी श्रीनगरमध्ये मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचीही भेट घेतली. त्यानंतर त्यांनी सांगितले की संपूर्ण जम्मू आणि काश्मीरने या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि राष्ट्राला पूर्ण पाठिंबा दिला. ते म्हणाले की मी काही जखमींना भेटलो आणि मृतांच्या कुटुंबियांना सांत्वन व्यक्त केले. त्यांनी जोर देऊन सांगितले की संयुक्त विरोधी पक्ष या कृतीचा निषेध करतो; आम्ही कोणत्याही कारवाईला पाठिंबा देतो.

## कुणाल कामराला तूर्त दिलासा

### मुंबई हायकोर्टाने दिले अटक न करण्याचे आदेश

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

मुंबई हायकोर्टाने पोलिसांना स्टँडअप कॉमेडीयन कुणाल कामराला अटक न करण्याचे आदेश दिले आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या तथाकथित विडंबन गीत विरोधात कुणाल कामरा याच्या विरोधात तपास सुरु आहे. पण 'कॉमेडियन' कुणालला अटक करून नये असे निर्देश कोर्टाने दिले आहेत. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती एस. एम. मोडक यांच्या खंडपीठाने कामराची याचिका स्वीकारली. कुणाल कामराने 'स्टँड-अप कॉमेडी शो' दरम्यान एकनाथ शिंदे यांच्यावर कथित विडंबन गीत केल्याने खार पोलिस ठाण्यात दाखल झालेला गुन्हा रद्द करण्यासाठी विनंती केली होती.



अंतिम दिलासा देताना खंडपीठाने महटलं की, याचिका प्रलंबित असताना 'कॉमेडियन' ला अटक करू नये. कोर्टाने म्हटलंय, ''तपास सुरु राहू शकतो. याचिकाकर्ता कुणाल कामराला याचिका प्रलंबित असताना अटक केलं जाऊ शकत नाही.'' 'जर कामरा आपला जबाब नोंद करू इच्छित असेल तर त्याला आधी सूचना देऊन नंतर चेन्नईमध्ये त्याचा जबाब नोंद करून घ्यायला हवा.' कामराने आपल्या याचिकेत म्हटलं होतं की, तो तामिळनाडूचा निवासी आहे आणि कार्यक्रमानंतर त्याला ज्या जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत, त्या कारणास्तव तो महाराष्ट्रात यायला घाबरत आहे.

कामराने पोलिसांनी दाखल केलेले गुन्हे रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका दाखल केलीय. या याचिकेवर सुनावणी पूर्ण होऊपर्यंत खंडपीठाने निर्णय राखून ठेवला आहे. तथाकथित प्रकरणाचा निर्णय होईपर्यंत कामराला अटक करू नये, असे खंडपीठाने आधीही स्पष्ट केले आहे. कुणाल विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे अटकेच्या भीतीने कुणालने गुन्हा रद्द करण्यात यावा अशी विनंती करणारी याचिका मुंबई हायकोर्टात दाखल केली होती.

कामराने कोर्टाला सांगितले की, त्या प्रकरणी चौकशीसाठी मुंबई पोलिसांच्या समक्ष व्हिडिओ-कॉन्फ्रसिंगच्या माध्यमातून हजर राहण्यासाठी तो तयार आहे.

## लश्कर-ए-तोयबाच्या टॉप कमांडरला भारतीय जवानांनी केले ठार

**श्रीनगर, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर देशवासियांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या हल्ल्यातील दहशतवाद्यांना जशास तसे उत्तर द्या अशी मागणी जोर धरू लागली आहे. त्यातच केंद्र सरकारसोबतच भारतीय लष्कर एक्शन मोडमध्ये आले आहे. शुक्रवारी बंदीपोरा इथं सैन्याला मोठं यश मिळाले. लष्करी जवानांनी लश्कर ए तोयबाचा टॉप कमांडर अल्ताफ लल्लीला चकमकीत ठार केला आहे. विशेष म्हणजे पहलगाम हल्ल्याची जबाबदारी लश्कर ए तोयबाच्या रेजिस्टेंस फोर्सनं घेतली होती.



२२ एप्रिलला पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २८ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला. त्यात काही महाराष्ट्रातील पर्यटकही होते. दहशतवाद्यांच्या या कृत्यानंतर काश्मीर खोऱ्यात भारतीय सैन्याकडून सर्च मोहीम वेगाने सुरू आहे. बंदीपोरा भागात काही दहशतवादी असल्याची माहिती सैन्याला मिळाली. त्यानंतर जम्मू काश्मीर पोलिसांसोबत मिळून सर्च ऑपरेशन सुरू केले. त्यावेळी लष्करी जवान आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. आज सकाळपासून या भागात जोरदार चकमक सुरू आहे. त्यात २ सुरक्षा जवान जखमी झालेत.

दहशतवादी नेटवर्कविरोधात सैन्याने कठोर पाऊल उचलले आहे. त्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या आणि पहलगाम हल्ल्यात सहभागी दहशतवादी आसिफ शेखचं घर बॉम्बने उडवण्यात आले आहे. आसिफ लश्कर ए तोयबाचा दहशतवादी होता. सुरक्षा जवानांनी त्रालमध्ये ही कारवाई केली.

बंदीपोरा भागात नाका तपासणीदरम्यान पोलिसांनी मोहम्मद रफिक खांडे आणि मुख्तार अहमद डार यांना पकडले. त्यांच्याकडून बेकायदेशीर शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. जेव्हा पोलिसांनी भारतीय सैन्यासह नाकेबंदी केली तेव्हा त्यांनी रईस अहमद डार आणि मोहम्मद शफी डार यांना अटक केली. त्यांच्याकडून हँड ग्रेनेड ०१, ७.६२ मिमी मॅगझिन ०१ आणि ७.६२ मिमीचे ३० राउंड जप्त करण्यात आले.

## अकरावी प्रवेशाला पुढील आठवड्यात मुहूर्त

**पुणे, दि. २५ प्रतिनिधी**

अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेला पुढील आठवड्यात सुरुवात होईल. त्यासाठीचे वेळापत्रक येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये जाहीर करण्यात येणार आहे. सॉफ्टवेअरमधील बदलामुळे यंदा विद्यार्थ्यांना फार थोडी माहिती भरावी लागणार असल्याचे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने येत्या १५ मेपर्यंत दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्या पार्श्वभूमीवर यंदा अकरावीची प्रवेश प्रक्रिया देखील लवकर सुरू करण्यात येणार असून, राज्यस्तरावर प्रवेश प्रक्रिया नेमकी कशा पद्धतीने राबवायची याचा शासन निर्णय येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये जाहीर करण्यात येणार असून, त्यानुसार संपूर्ण राज्यात प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेली काही वर्षे सहा



महापालिका क्षेत्रांमध्ये राबवण्यात येणारी अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येणार आहे. संबंधित प्रक्रिया १ एप्रिलपासूनच सुरू करण्यासंदर्भात सांगण्यात आले होते. परंतु, संबंधित प्रक्रिया काही तांत्रिक कारणास्तव पुढे ढकलण्यात आली आहे.

गेली काही वर्षे मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआरडीए), पुणे, पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महानगरपालिका क्षेत्रात ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेची उपयोगिता लक्षात घेऊन संबंधित प्रवेश प्रक्रिया राज्यभर राबवण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक स्तरावरून करण्यात येईल, तर शिक्षण आयुक्तांचे प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण राहणार आहे.

पुणे, अहिल्यानगर, नाशिक या तिन्ही जिल्ह्यांची प्रवेश प्रक्रिया पूणे उपविभागीय संचालक स्तरावर राबविली जाणार आहे. अशाच प्रकारे राज्यातली इतर विभागांमध्ये विभागनिहाय उपसंचालक स्तरावरून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरू करून एजन्सीची नियुक्ती देखील करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# शक्ती असली पाहिजे, ती दिसलीही पाहिजे

## पहलगाम हल्ल्याबाबत मोहन भागवत यांचे विधान

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. पाकिस्तानच्या या वृत्तीला ठेचलंच पाहिजे, अशा प्रकारच्या भावना सर्वच स्तरातून उमटत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरूनही इतर देशांकडून भारताच्या पाठीशी ठाम असल्याची भूमिका मांडण्यात आली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाकिस्तानविरोधात लष्करी कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी पहलगाम हल्ला व त्यावर भारताची भूमिका यासंदर्भात भाष्य केलं आहे.

पंडित दीनानाथ मंगेशकर यांच्या ८३व्या स्मृतिदिन सोहळ्याच्या निमित्ताने विलेपार्ले येथे पुरस्कार सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या सोहळ्याला सरसंघचालक मोहन भागवत यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आलं होतं. या सोहळ्यात मोहन भागवत यांनी केलेल्या भाषणात पहलगाम हल्ला व त्यावर देशभरात व्यक्त होणारा संताप यावर त्यांनी मत व्यक्त केलं. यावेळी हिंदू धर्म हाच मानवधर्म असल्याचंही ते म्हणाले.

मोहन भागवत यांनी यावेळी जगात एकच धर्म असून तो मानल धर्म असल्याचं म्हटलं. "जगात एकच धर्म आहे.. मानव धर्म. त्यालाच हिंदू धर्म म्हणतात. आपल्या जवानांनी किंवा आपल्याकडच्या लोकांनी कधी कुणाला धर्म विचारून त्याला मारलं नाहीये. काल कट्टरपंथीयांनी जो उत्पात केला, तसा हिंदू कधीही करणार नाही. पण आपल्या संप्रदायाचा चुकीचा अर्थ लावणारे कट्टरपंथी असं करतील. त्यामुळे देश बलवान पाहिजे", असं ते म्हणाले.

"आपल्या मनात दु:ख आहे.



सगळ्यांचच अंत:करण जड आहे. सगळ्या कुटुंबीयांच्या दु:खात आपण सहभागी आहोत. पण आमच्या मनात क्रोधही आहे. तो असला पाहिजे. असुरांचं निर्दालन व्हायचं असेल, तर अष्टादश भुजांची शक्ती असलीच पाहिजे. चांगलेपणा दुरुस्त करण्याचे सृष्टीचे जे मार्ग आहेत, त्यात एक मार्ग समजावून देण्याचा असतो. अनुभवातून मनुष्य शिकतो आणि सुधारतो. काही लोक असे असतात जे सुधरतच नाही. जे शरीर, मन त्यांनी धारण केलंय, त्यात परिवर्तन शक्य नसतं", असं म्हणत मोहन भागवत यांनी आक्रमक भूमिकेचं समर्थन केलं.

दरम्यान, यावेळी मोहन भागवत यांनी प्रभू श्रीराम यांनी रावणाचा वध केल्याचं उदाहरण दिलं. "रावण शिवभक्त होता, वेदशास्त्रसंपन्न होता. एक चांगला माणूस बनण्यासाठी जे काही आवश्यक असतं, ते सगळं त्याच्याकडे होतं. पण जे शरीर-मन-बुद्धी त्याची बनली, ती बदलायला तयार नव्हती. दुसरा उपायच नव्हता. रावण जोपर्यंत हा देह सोडत नाही आणि दुसरा देह धारण करत नाही त्याशिवाय तो सुधारणार नाही. त्यामुळे रावण सुधारला पाहिजे. म्हणून रामानं त्याचा वध केला. अशा दुष्ट माणसांचं निर्दालन झालं पाहिजे. क्रोध आहे, अपेक्षाही आहेत. त्या अपेक्षा पूर्ण होतील असं वाटतं मला", असं त्यांनी म्हणताच उपस्थितांनी त्यांच्या या भूमिकेला टाळ्या वाजवून समर्थन दिलं.

"७५ वर्षं होऊन गेली. पण परवा पाकिस्तानच्या सेनाप्रमुखांनी पुन्हा द्विराष्ट्रवादाची थिअरी मांडली. हे लक्षात आलं पाहिजे. सगळं जग एक कुटुंब आहे. कोणताही पंथ, संप्रदाय असला तरी तो एक ना एक दिवस माणसाला एका सत्याकडे घेऊन जातो. एकाच सत्याकडे तो नेतो", असं ते म्हणाले.

"द्वेष, शत्रुता हा आपला स्वभाव नाही. पण मार खाणं हाही आपला स्वभाव नाही. शक्तीवान माणसाला अहिंसक असायला हवं. जो दुर्बल आहे, त्याला हे व्हायची गरजच नाही. त्याला व्हावंच लागतं अहिंसक. म्हणून शक्ती असायला हवी. ती दिसलीही पाहिजे, म्हणजे जगाला कळतं हे शक्तीवान आहेत, यांच्या वाट्याला जाऊ नये. मग जगातल्या दुष्ट लोकांनाही हे समजतं", अशा शब्दांत मोहन भागवत यांनी त्यांची भूमिका मांडली.

# बनावट दस्तऐवजातून माडसांगवीतील वडिलोपार्जित मिळकत केली हडप

## जमीन मालकांचा मंत्री गिरीश महाजन यांच्यावर आरोप; पोलिस दखल घेत नसल्याची तक्रार

**नाशिक ।** महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीष दत्तात्रय महाजन यांनी सुनील देवकिनंदन झंवर यांच्या नावाने बेनामी व्यवहार करुन, बनावट दस्तऐवज तयार करुन वडिलोपार्जित मिळकत हडप केली असल्याचा आरोप माडसांगवीतील जमीन मालकांनी केला आहे.

दाव्यामध्ये तडजोड कण्यासाठी नाशिक पोलिसांच्या मदतीने आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जात असल्याचा आरोपदेखील त्यांनी केला आहे. पोलिस आमची तक्रार घेत नाही. त्यांना रजिस्टर पोस्टाने तक्रार पाठवूनही कोणतीही कारवाई केली जात नसल्याचा आरोपही केला आहे. शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी यावेळी केली आहे. या संदर्भात पत्रकार परिषद घेत माडसांगवी येथील मिळकतमालकांनी आरोप केले आहेत. या आरोपानुसार मौजे माडसांगवी (तालुका व जिल्हा नाशिक) येथील सर्व्हे क्रमांक. २३, २४, २९, ३१/१, ३१/२, ३२, ३३/अ/१, ३३/अ/२ या मिळकती आमच्या वडिलोपार्जित मालकीच्या आहेत. त्याचा गट क्रमांक १३ हा झाला आहे. या जमिनी या पडित होत्या व तेथे गुरु चरायचे. आजच्या स्थितीतही जमीन पडित आहे. गावातील त्रयस्थ व्यक्ती मोतीराम पेखळे व इतरांनी बनावट दस्तऐवज तयार करुनर मिळकतीवर त्यांची नावे लावून घेतली. तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी सदर व्यक्तींविरोधात फौजदारी कारवाई करण्याचे आदेश दिले. तसेच सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशी आदेश दिले. असे असतानाही सदर त्रयस्थ व्यक्तींनी आमची मिळकत भारत स्टिल ट्युब्स कंपनी यांना विक्री केली. तसेच त्या कंपनीने मंत्री गिरीष दत्तात्रय महाजन यांनी बेनामी व्यवहार सुनील झंवर यांच्या नावाने करुन मिळकत त्रयस्थ व्यक्तीकडून खरेदी केली. महाजन यांनी फोनद्वारे खरेदीदारांसोबत व्यवहाराची बोलणी केल्याने त्याचा मिळकतीशी काहीतरी संबंध आहे. यासंदर्भात त्यांनी तो स्पष्ट करणे गरजेचे आहे. त्यांची जमीन नसेल तर नाशिक पोलिस सदर भूमाफियाला मदत करण्यासाठी खोटे गुन्हे दाखल का केले जात आहेत, यासंदर्भात खुलासा होणे गरजेचे आहे.



### मग आमच्यावर अन्याय का?

गट क्रमांक १३ या जमिनीव्यतिरिक्त इतरही गटांना मोतीराम पेखळे व इतर यांची नावे लाऊन घेतली होती. त्या गटांपैकी गट क्रमांक ३५ चे धारकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अपिल केले होते. त्या अपिलाचा निकाल देताना सदर इसमांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे व सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन जिल्हाधिकारी शेखर गायकवाड यांनी दिले होते, अशी माहिती पत्रकार परिषदेत दिली.

### पोलिस खात्याचे हेतूपुरस्कार दुर्लक्ष!

आरोपींनी फसवणूक करुन आमची मिळकत हडप केली म्हणून सरकारवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र संशयितांवर कुठलीही कारवाई झाली नाही. त्यामुळे नाशिकचे पोलिस आयुक्त यांच्याकडेदेखील तक्रार केली. मात्र त्यांनीही दखल घेतली नाही. पोलिस खाते या प्रकरणाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही मिळकतमालकांनी केला आहे. या पलीकडे जाऊन आरोपी यांनी पदाचा गैरवापर करत नाशिक पोलिसांची मदत घेऊन मिळकत मालक व वकीलांविरुद्ध मिळकत मालकांचे घरगुती वैयक्तिक मुखत्यारपत्राबाबत बनावट असल्याची तक्रार करुन गुन्हा दाखल केला आहे. वस्तुस्थितीत सदर मुखत्यारपत्र हे आमचे वैयक्तिक असल्याने त्रयस्थ व्यक्तींना तक्रार करण्याचा अधिकार नाही. अशा प्रकारे तक्रार करण्याची कायद्यात तरतूद नसल्याचेही मिळकत मालकांनी पत्रकार परिषदेतून लक्षात आणून दिले. तरीदेखील मिळकतीचे वादामध्ये तडजोड करावी म्हणून दबाव आणण्यासाठी मिळकत मालकांवर व वकीलांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत. आडगाव पोलिसांना सर्व कागदपत्रे व न्यायालयाचे निकाल देऊनही ते आरोपींविरुद्ध कारवाई करण्याऐवजी या प्रकरणातील भुमाफिया यांना मदत करण्यासाठी जमीन मालकांवर व वकीलांवर कारवाई करत असल्याचा आरोप करताना पोलिसांच्या भूमिकेचा निषेध नोंदविला आहे.

## महत्त्वाचे

### झाकीर हुसेन रुग्णालयात यात्रेकरूंसाठी लसीकरण

**नाशिक ।** येथील महापालिकेच्या डॉ.झाकीर हुसेन रुग्णालयात हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांचे लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेतर्फे देण्यात आली. हज जत्रेसाठी जाणाऱ्या भाविकांचे लसीकरण बुधवार आणि गुरुवार असे दोन दिवस लसीकरण होणार आहे. हे लसीकरण यात्रेसाठी आवश्यक असल्याने भाविकांनी लसीकरण करण्यासाठी गर्दी केली होती. जून महिन्यातच यात्रा होणार आहे. 29 एप्रिलपासून राज्यात यात्रेसाठी विमान सेवा उपलब्ध उपलब्ध करण्यात आली आहे. यात्रेला जाण्यापूर्वी मेंदूज्वर लसीकरण होणे आवश्यक आहे. डॉ. झाकीर हुसेन रुग्णालयात गुरुवारी (दिनांक 23) ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. शहराच्या विविध भागातील हज यात्रेकरूंनी लाभ घेतला. लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्र मिळणार आहे. कमिटीचे शहरातील सदस्य देखील मदतीसाठी उपस्थित होते.

### मुक्त विद्यापीठाच्या ‘यशवाणी’वर विज्ञान-गणित संकल्पना काव्यवाचन

**नाशिक ।** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ‘यशवाणी’ वेबरेडिओवर विज्ञान गणितातील सूत्र–संकल्पनांवर आधारित




काव्याचे वाचन करण्यात आले. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या कल्पक मार्गदर्शनानुसार हा सहावा ऑनलाईन कार्यक्रम होता. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रास्ताविकात त्यांनी विज्ञान, गणितीय सूत्र- संकल्पना काव्याचे अध्यापनातील महत्व विषद केले. या कार्यक्रमात कवयित्री मनीषा पाटील यांनी शोध व संशोधक, जैवतंत्रज्ञान, गणितीय संच आदी तर कवी डॉ. राजेंद्र बगाटे यांनी विज्ञानाचे साक्षात्कार, विद्युत प्रभार, विज्ञान थोरवी कविता सादर केल्या. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रकाश सापनर व गिरीश गवळी यांनी या कार्यक्रमासाठी तंत्रसहाय्य केले.

### सनराइज स्कूलमध्ये इंग्रजी भाषा दिन साजरा

**नाशिक ।** मविप्र सनराइज स्कूलमध्ये इंग्रजी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इंजि.पोपटराव पाचोरकर, चांदवड तालुका शिक्षण विस्तार अधिकारी वसंतराव खैरनार, प्राचार्य डी. बी. ढिकले यांनी विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेमध्ये विविध उपक्रम विद्यार्थ्यांसमोर सादर केले. विद्यार्थ्यांसमोर नाटिका सादर करून अतिशय सोप्या पद्धतीने इंग्रजी भाषा तसेच व्याकरणाचे महत्त्व विशद केले. प्राचार्य डी. बी. ढिकले म्हणाले, इंग्रजी भाषेचा सराव केल्यास ती सहजच आत्मसात होऊ शकते, सर्व विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा सराव करून ती आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तसेच विल्यम शेक्सपियर यांचे पुस्तके वाचा हेदेखील त्यांनी सांगितले. इयत्ता सातवीचा विद्यार्थी कु. सिद्धेश वाकचौरे याने इंग्रजी भाषा दिनाची माहिती सांगितली. अथर्व आथरे, सिद्धेश वाघ यांनी सूत्रसंचालन केले. इयत्ता दहावीचा विद्यार्थी कृष्णा वक्ते याने आभार मानले. इंग्रजीच्या शिक्षिका श्वेता माळोदे, सारिका चित्ते, पूजा गायकवाड, शालन पाटील, उषा जाधव, योगिता जाधव, जयश्री निकम, संगीता जाधव, नयना रुपवते तसेच शिक्षकेतर कर्मचारी सचिन भवर, रेश्मा चौधरी उपस्थित होते.

### समद मनियारची टी-१० राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**नाशिक ।** मविप्र संचलित दिंडोरी येथील होरायझन अकॅडमीतील समद मनियार या अष्टपैलू खेळाडूची गोवा येथे होणाऱ्या १४ वर्षांखालील टी-१० या राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली असून, मविप्र पदाधिकाऱ्यांसह सर्व संचालक मंडळाने समदच्या निवडीचे स्वागत केले आहे.



गोंदिया जिल्ह्यातील हलबीटोला येथील पूजा शारीरिक महाविद्यालयात दि. १८ ते २० एप्रिल दरम्यान पार पडलेल्या १४ वर्षे वयोगटाखालील चौथ्या राज्य सबज्युनियर/ज्युनियर टी-१० क्रिकेट चॅम्पियनशिपमध्ये समद मनियारने अष्टपैलू कामगिरी करीत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. समदच्या या अष्टपैलू कामगिरीमुळे गोवा येथे होणाऱ्या टी-१० या राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. या विद्यार्थ्याला शाळेच्या प्राचार्या निर्मला जाधव, क्रीडाशिक्षक रुपेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व पदाधिकारी तसेच दिंडोरी-पेठ मविप्र संचालक प्रवीण जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप घोरपडे, रणजित देशमुख, सुजित मुरकुटे, भारत खांदवे आदींनी या विद्यार्थ्याच्या निवडीचे स्वागत करून त्याला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कॉम्प्युटर सायन्स म्हणजे पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड : प्राचार्य डॉ. शिंदे

**नाशिक ।** निफाड व परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक युगात स्पर्धा करता यावी, बदलत्या काळासोबत समायोजन साधत, पारंपरिक शिक्षणासोबत वैज्ञानिकतेची कास धरता यावी म्हणून, निफाड महाविद्यालयाने २०२२ साली बी.सी.एस. कॉम्प्युटर सायन्स ही नवी शाखा सुरू केली.



यासाठी मविप्र सर्व पदाधिकारी व कार्यकारणी, स्था.व्य.समिती सदस्य, सभासद, हितचिंतक या सर्वांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले, त्याचे फलित म्हणजे कॉम्प्युटर सायन्सची पहिली बॅच यावर्षी बाहेर पडत आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंब समाजासाठी चांगले कार्य करण्याचे व पुढील उच्च शिक्षण घेऊन चांगली नोकरी व व्यवसायासाठी शुभेच्छा देत, हे विद्यार्थी पुढे अनेक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करून निश्चितच निफाड महाविद्यालय व मविप्र संस्थेचा नावलौकिक "शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी" या उक्तीप्रमाणे सार्थ करतील, असा विश्वास प्राचार्य डॉ. ए. के. शिंदे यांनी व्यक्त केला. क.ग.दा. मोरे निफाड महाविद्यालयात ‘तृतीय वर्ष संगणक विज्ञान’ विभागाचा निरोप समारोपाच्या कार्यक्रम प्रसंगी माजी प्राचार्य डॉ. ए. के. शिंदे प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी अध्यक्षीय मनोगतात निफाड गाव, परिसर व महाविद्यालयाचा सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा विशद करत निफाड महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन प्राचार्य या नात्याने मी सर्वतोपरी कार्य करण्यास कटिबद्ध असल्याचा विश्वास व्यक्त करून विद्यार्थ्यांना पुढील काळातील नोकरी व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी ट मनोगतात महाविद्यालयीन अनुभव व्यक्त करून महाविद्यालया विषयी ऋण व्यक्त करून आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी परीक्षा विभाग प्रमुख डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. सुसान लारेन्सिया, प्रा.योगेश कडलक यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्रद्धा गवळी यांनी केले, सूत्रसंचालन प्रांजली खैर आणि आभार वैशाली गायकवाड व जानवी अहिरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी डॉ. आर. डी. शिंदे, डॉ. सुरेखा जाधव, डॉ. महेश बनकर, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. ज्ञानेश्वर मोगल, प्रा. एन.डी. सोनटक्के, सर्व प्राध्यापक वर्ग, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रवासातील माणुसकीचा असाही अनुभव...

त्या दिवशी शाळेतून मी नाशिक येताना ज्या बसमध्ये बसली होती त्या बसमध्ये चांदवडच्या घाटात एका वयस्कर आजीला चक्कर येत होती. घाम फुटत होता. तिचा मुलगा जागा नसल्यामुळे उभा होता. मलादेखील जागा नसल्यामुळे मीही उभी होती. मुलाला वाटले की आईचे काही खरे दिसत नाही. म्हणून त्याने कंडक्टरला आवाज दिला व बस थांबवण्यास सांगितले. त्याप्रमाणे बस थांबली व तो लगबगीनं वाट काढत बसमधून आईचा हात पकडून आईला सांभाळत घेऊन उतरू लागला. मी उभीच होती. तो मला म्हणाला की, मॅडम आमच्या तेवढ्या दोन-तीन बॅग घेऊन खाली या. मी लगेचच त्यांच्या बॅगा घेतल्यावर बसच्या खाली आम्ही उतरलो. त्यांच्या आईला रस्त्याच्या कडेवरील एका झाडाखाली सावलीत बसवले. त्यांना पाणी दिले. त्यांचा घाम पुसला. त्यांची विचारपूस केली की कुठे जायचे आहे. आजींनी सकाळपासून काही खाल्ले नाही का? त्यांना काय त्रास होत आहे? असे अनेक प्रश्न मी त्यांना विचारले. त्यांना भिवंडी जायचे होते. तिकीटही भिवंडीचे काढले होते. त्याबरोबरच मी विचार केला की आता काय करायचे म्हणून रोडच्या बाजूला उभी राहिली व येणाऱ्या कारला हात देऊ लागली. जवळ चांदवडच्या एका हॉस्पिटलमध्ये यांना भरती करावे, असा माझ्या मनात विचार आला. बऱ्याच गाड्या भरधाव वेगाने पुढे जात होत्या. दहा एक मिनिटांनी एक गाडी उभी राहिली. मी त्या गाडीमागे पळत सुटली व त्यांना विनंती केली की, या बसमधील एक प्रवासी आजी आहेत. त्यांना खूप घाम फुटला आहे व त्यांना चक्कर येत आहे. कदाचित त्यांची बीपी लो झाला असेल किंवा साखर वाढली असेल किंवा कमी झाली असेल! तरी कृपया आपण या आजी व त्यांच्या मुलाला आपल्या गाडीने हॉस्पिटलला सोडावे ही विनंती! कारमधील व्यक्तीही बोलली की, काही हरकत नाही मॅडम! तुम्हीही चला. मी म्हटले की, माझे तिकीट नाशिकपर्यंत आहे. मी बसने येत आहे. मागून आजी व मुलाला गाडीत बसविले. त्यांना माझ्यासोबतच बसमधील दोन तरुण प्रवासी मुलांनी आजीला बिस्किट पुडा व कॅडबरी दिली. आजीच्या डोक्यावरून मी हात फिरवला व आजीचा चेहरा जणू मला आशीर्वाद देत आहे, असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. काळजी घ्या! असे बोलत मी बसमध्ये चढली. माझी जागा तर नव्हतीच मी उभीच होती. आल्यानंतर त्या आजींची जागा खाली झाली होती. त्यावर त्यांच्या शेजारी बसलेल्या मावशीने हे चित्र बघितले होते की या मुलीने आजी व मुलाला खाली उतरवण्यास, गाडी बघून देण्यास, त्यांच्या बॅग व सामान वाहून देण्यास मदत केलेली आहे. म्हणून आजीची जागा मला देण्यात आली होती. तरी एक आजोबा वयस्कर उभे होते मला वाटलं की यांना माझ्यापेक्षा जागेची गरज जास्त आहे. म्हणून मी पुन्हा उभी राहिली व त्या आजोबांना जागा दिली. हे सांगण्याचे कारण असे की माझ्यात माणुसकी आहे. व दुसऱ्यांच्या भावना समजून घेण्याचे मन देखील आहे. तरीदेखील आपणही थोड्याफार प्रमाणात इतरांची मदत करावी आपल्याला एक आत्मिक समाधान प्राप्त होते. धन्यवाद...

**– सीमाराणी बागुल, नाशिक**

# दहशतवादी हल्ल्याचा नांदगाव शिवसेनेतर्फे निषेध

नांदगाव । नांदगावचे आमदार शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव शिवसेनेतर्फे येथे जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे अतिरेक्यांनी निष्पाप हिंदू पर्यटकांवर धर्म विचारून अंधाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात सुमारे 28 ते 30 पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हा हल्ला देशाच्या सर्व भौमतत्वावरील हल्ला असून याला सडेतोड उत्तर हे भारत सरकारने देऊन अशा फुटीरवादी संघटना या समूळ नष्ट करण्याची गरज आहे.



नांदगाव शिवसेना शहराच्यावतीने या हल्ल्याचा जळजळीत निषेध करीत असून या हल्ल्याचा प्रतिशोध भारत सरकारने कठोर कारवाई करून घ्यावा, अशा अशयाचे निवेदनज् नांदगाव शहर शिवसेनेच्या वतीने नांदगाव पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार यांना देण्यात आले. नांदगाव शहरातील हुतात्मा चौक येथून भारत माता की जय, वंदे मातरम च्या घोषणा देत पोलीस स्टेशन पर्यंत निषेध रॅली काढण्यात आली.या वेळी बोलताना वारंवार होणाऱ्या अशा घटना थांबल्या नाहीत तर पुढे देशभरात असंतोष निर्माण होईल म्हणून सरकारने कठोर पाऊल उचलावे असे मत सुनील जाधव यांनी व्यक्त केले. याप्रसंगी विष्णू निकम, माजी नगराध्यक्ष अरुण पाटील, युवा सेना तालुकाध्यक्ष सागर हिरे, जगताप सर, शिवसेना शहरप्रमुख सुनील जाधव, दीपक मोरे, अय्याज शेख, रमेश टाकळीज, भैय्यासाहेब पवार, संतोष शर्मा, मधुकर मोरे, संजय सानप, शरद उगले, मुस्ताक शेख, बापू जाधव, भिकन खटके, सुनील सर, शरद आयनोर, तानसेन जगताप, भगीरथ जेजुरकर, सुविचार सौ. भारती बागोरे, सद्दाम शेख, महेंद्र गायकवाड, दिनेश ओचानी, जय खरोटे, सुरज पाटील आदींसह शिवसैनिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# येत्या १ मे रोजी प्रदर्शित होणार मुरलेल्या प्रेमाचा ‘गुलकंद’!

**नाशिक ।** ‘गुलकंद’ चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाल्यापासून चित्रपटाबद्दलची उत्सुकता आता आणखीच वाढली आहे. एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आणि वेटक्लाऊड प्रॉडक्शन्स निर्मित आणि दिग्दर्शक सचिन गोस्वामी यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला ‘गुलकंद’ हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनात घर आता करण्यास सज्ज आहे. या चित्रपटात सई ताम्हणकर, समीर चौघुले, ईशा डे, प्रसाद ओक, वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, आणि शार्विल आगटे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. ‘गुलकंद’ची निर्मिती सचिन गोस्वामी, सचिन मोटे आणि संजय छाब्रिया यांनी केली आहे.




ट्रेलरमधून “प्रेम कधीही, कुठेही, कुठल्याही वयात होऊ शकतं” या प्रसादच्या संवादाने उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कथेत ढवळेंची मुलगी मीनाक्षी आणि मानेंचा मुलगा ओंकार यांच्या लग्नासाठी दोन कुटुंबं एकत्र येतात. परंतु या भेटीत अजून एक वेगळंच नातं निर्माण होतं. आता ढवळे आणि माने कुटुंबांमध्ये काय गोंधळ उडणार? आणि ही गुंतागुंत सुटेल का? याचं उत्तर १ मे रोजी प्रेक्षकांना चित्रपटगृहात मिळणार आहे. ‘गुलकंद’ हा एक हलकाफुलका कौटुंबिक विनोदी चित्रपट असून, नात्यांमधली गुंतागुंत, भावना, हास्य आणि गोडवा यांचा एक सुरेख मेळ आहे. ढवळे-माने कुटुंबांच्या संसारात मुरलेला ‘गुलकंद’ प्रेक्षकांसाठी एक परिपूर्ण मनोरंजनाचा अनुभव ठरेल, याची खात्री आहे.

चित्रपटातील गाणीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहेत. चित्रपटातील ‘चंचल’ या सुरेल गाण्यानं रसिकांच्या मनाला हळूवार स्पर्श केलाय. गाण्यात दाखवण्यात आलेली प्रेमाची सुंदर आणि गोड दृश्यं प्रेक्षकांच्या मनात घर करणारी आहेत. या भावपूर्ण गाण्यांना मंदार चोळकर यांनी शब्दबद्ध केले आहे तर अविनाश - विश्वजीत यांनी संगीत दिले आहे. ओठांवर सहज रुळणारं हे गाणं आनंदी जोशी आणि रोहित राऊत यांनी गायलं आहे. तर चित्रपटातील दुसरं गाणं ‘चल जाऊ डेटवर’ हे गाणंही सध्या ट्रेण्डिंगमध्ये आहे. गंमतीदार अंदाजातील या गाण्याचे बोल, संगीत प्रेक्षकांना भावणारे आहे. हे गाणं ऐकायला जितकं छान आहे, तितकंच त्याचं सादरीकरणही अप्रतिम आहे. वैशाली सामंत आणि अवधूत गुप्ते यांच्या कमाल आवाजातील या गाण्याला प्रशांत मडपूवार यांच्या शब्दांची व अविनाश विश्वजीत यांच्या जबरदस्त संगीताची जोड लाभली आहे.

दिग्दर्शक सचिन गोस्वामी म्हणतात, “नातं जेव्हा एकसुरी होतं, तेव्हा त्यातला गोडवा टिकवणं महत्त्वाचं ठरतं, आणि हाच गोडवा ‘गुलकंद’ चित्रपटात आहे. प्रत्येक पात्र प्रेक्षकांना आपलं वाटेल. आजवर आम्ही अनेक विनोदी प्रोजेक्ट्स केले, पण या चित्रपटात भावना, नाती, प्रेम आणि विनोद यांचा सुंदर संगम आहे. एव्हरेस्टचे संजय छाब्रिया या कुटुंबाचा भाग झाले, हे आमचं भाग्य. ही टीम एकमेकांना ओळखते, त्यामुळे ‘गिव्ह अँड टेक’ अप्रतिम झाला आहे. हाच अनुभव प्रेक्षकांना मिळेल.” निर्माते संजय छाब्रिया म्हणतात, “‘गुलकंद’ हे आमचं एक खास सिनेमॅटिक गिफ्ट आहे. दर्जेदार आणि संपूर्ण कुटुंबाने एकत्र पाहावा असा चित्रपट आम्ही आणत आहोत.

कलाकार, दिग्दर्शक, सगळ्यांनी कमाल काम केलं आहे. मला विश्वास आहे की, प्रेक्षकांना या गोडसर अनुभवाचा नक्कीच आनंद मिळेल.” नाशिकच्या ‘मुहूर्त’ मॉल येथे झालेल्या पत्रकार परिषदेत अभिनेत्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना दिलखुलास उत्तरे दिली.

## निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिरात दर्शन



उटीच्या वरीनिमित्त श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिरात निवृत्तीनाथदादांच्या प्रतिमेचे खासदार भगरे, मविप्रचे सरचिटणीस नितीन ठाकरे यांच्यासह मान्यवरांनी दर्शन घेतले. समवेत संत निवृत्तीनाथ मंदिराचे ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ घोटेकर, सचिव नीलेश गाढवे.

## ➤ महत्त्वाचे

### नामको बँकेच्या अध्यक्षपदी हेमंत धात्रक यांची निवड



**नाशिक ।** येथील दि. नाशिक मर्चंट को-ऑफ बँकेच्या अध्यक्षपदी हेमंत धात्रक यांची निवड झाली आहे. धात्रक यांनी अध्यक्षपदाची हॅट्रिक केली आहे. संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत धात्रक यांची बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. धात्रक हे व्ही. एन. नाईक शिक्षण संस्थेचे सरचिटणीसही आहेत. नामको बँकेच्या सातपूर येथील सभागृहात आयोजित छोटेखानी समारंभात खासदार राजाभाऊ वाजे, ज्येष्ठ संचालक विजय साने, धनराज चौधरी, गुरमीत बग्गा, कोंडाजी आव्हाड, दत्ता गायकवाड, जयंत जायभावे, आदींची धात्रक यांचा गुणगौरव करणारी भाषणे झाली. मावळते चेअरमन सोहनलाल भंडारी म्हणाले, धात्रक यांच्यावर असणारा विश्वास बँकेची प्रगती दर्शविणारा आहे. माजी आमदार वसंत गीते यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला पुंजाभाऊ सांगळे, दामोदर मानकर, लक्ष्मण जायभावे, शिवाजी चुंबळे, शैलेश कुठे, प्रकाश घुगे, सुनील चोपडा, गोकुळ गिते, दिगंबर गीते, जयप्रकाश जातेगावकर, आनंद वाघमारे, सपना बागमार उपस्थित होते.

### मुस्लिम समाजातर्फे दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**नाशिक ।** काश्मीर येथील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा मुस्लिम समाजाने निषेध केला आहे. शहर -ए-खतीब हाफिज हिसामुद्दीन खतीब यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला तसेच सारडा सर्कल येथील नॅशनल उर्दू हायस्कूल संस्थेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून गुरुवारी निषेध रॅली काढण्यात आली होती. दहशतवादास इस्लाम धर्माचा थारा नाही दहशतवादी हल्ले करून निष्पाप लोकांना ठार मारणे धर्माला मान्य नाही. घडलेली घटना अतिशय दुःखाची आणि शोचनीय आहे, अशा शब्दात हल्ल्याचा तीव्र निषेध करीत असल्याचे सुन्नी मर्कजी सिरत कमिटीचे अध्यक्ष तसेच शहर-ए-खतीब हाफिज हिसमोद्दीन खतीब यांनी सांगत शोक व्यक्त केला. सारडा सर्कल येथील युज नॅशनल कॅम्पसमध्ये निषेध रॅली काढण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी हल्ल्याचा निषेध करणारे फलक हातात घेऊन निषेध नोंदविला. नॅशनल कॅम्पस व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष हाजी बबलू पठाण, उपाध्यक्ष सोहेल शेख, सचिव प्रा. शाहीर शेख, सहसचिव एजाज काजी, खजिनदार गोसनूर खान, कार्यकारी सदस्य ॲडव्होकेट बाबा सय्यद, सलीम सय्यद, प्राचार्य तौसीब शेख, मुख्याध्यापिका शाह आदींनी घटनेचा निषेध व्यक्त करून शोध व्यक्त केला तसेच हल्ल्यातील तो सिल्वर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

### नाशिकमध्ये दोनशे वृक्ष धोकादायक

**नाशिक ।** नाशिक शहरामध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या धोकादायक वृक्षांमुळे नागरिकांच्या जीवित याला धोका निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे उद्यान विभागाकडून धोकादायक वृक्षांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यात जवळपास दोनशेहून अधिक धोकादायक वृक्ष शहरात आढळून आले आहेत. यातील 25 वृक्षांचा धोकादायक भाग उतरवण्यात आला आहे. धोकादायक वृक्ष उतरण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. त्या अनुषंगाने उद्यान विभागाने सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या होत्या; मात्र सर्वेक्षणाची काम भीमा गतीने सुरू होते. गंगापूर रोडवर वृक्षाची फांदी कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला होता तर एक जण गंभीर जखमी झाला होता. त्यामुळे महापालिकेने तातडीने धोकादायक वृक्षांची माहिती संकलित करण्याच्या सूचना दिल्या होत्या.










# अखेर, वादग्रस्त पुणेगाव कालवाप्रकरणी चौकशीचे आदेश

## अधिकाऱ्यांना उशिरा सुचले शहाणपण; पारदर्शक चौकशीची अपेक्षा

**नाशिक ।** पुणे गाव डाव्या कालव्याचे कामकाज मोठ्या प्रमाणात प्रलंबित असताना कार्यकारी अभियंता आणि उपाभियंता यांनी भामटेगिरी करून ८ कोटी रुपयांचे बिल काढून घेतल्या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर दखल घेण्यात आली आहे. याबाबत वस्तुस्थिती तपासून दै. महासागरने केलेल्या पोलखोल संदर्भात सखोल चौकशीचे आदेश लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अहिल्यानगर येथील उपअधीक्षक अ.ल जाधव यांनी दिले आहेत. त्यामुळे उशिरा का होईना अधिकाऱ्यांना शहाणपण सुचल्याचे दिसून येत आहे.

सिंचन विभागातील नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभागातील पुणेगाव कालवा, उपविभाग उनंदा नगर कडून पुणेगाव डाव्या कालव्याचे माती काम अस्तरीकरणाच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. हे काम मोठ्या प्रमाणात प्रलंबित असताना या विभागाचे कार्यकारी अभियंता मनोजकुमार डोकचोळे आणि उपाभियंता योगिता घुगे यांनी मार्च एंडच्या नावाखाली महामंडळाला तब्बल १२ कोटी रुपयांचे बिल सादर केले. एक महिन्यापूर्वीच या विभागाने सुमारे पाच कोटी रुपयाचे बिल मंजूर करून घेतल्याचे बोलले जाते असे असताना ठेकेदाराला हाताशी धरत पुन्हा १२ कोटी रुपयांचे बिल सादर करून त्यापैकी ८ कोटी रुपयांचे बिल लाटल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे.या प्रकरणाची तक्रार झाल्यानंतर दै 'महासागर'ने भूमिका घेत अधिकाऱ्यांच्या भामटेगिरीला वाचा फोडली.




कामाच्या ठिकाणी पाहणी करून वस्तुस्थिती तपासली असता काही गावांमध्ये ही कामे झालीच नसल्याचे वास्तव उघडकीस आले. या संपूर्ण कामाची पाहणी केल्यानंतर यातील अधिकाऱ्यांची बनवेगिरी उजेडात आणली.

दै. महासागरने केलेल्या पंचनाम्याची अहिल्यानगर येथील लाभक्षेत्र विकास प्राधिकरणने दखल घेतली असून या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सहाय्यक अभियंता आर.आर. जाधव यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. त्यांनी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करण्याबाबत आदेश देण्यात आले असून 'महासागर'ने उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत शासन नियमानुसार योग्य कारवाई करण्यात येणार असल्याचे पत्र त्यांनी काढले आहे. त्यामुळे या वादग्रस्त प्रकरणाची पारदर्शकपणे चौकशी करून अहवाल देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**याप्रकरणी सुरू झालेल्या चौकशीने सिंचन वर्तुळात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणावर दैनिक महासागर सातत्याने लक्ष ठेवून असणार आहे. त्यामुळे अधिकारी आणि ठेकेदार यांनी केलेल्या भामटेगिरीची सखोल आणि पारदर्शकपणे चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.**

**सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**

## नाशिकमध्ये स्वाद काठियावाडचा सौराष्ट्रच्या पारंपरिक चवींचा अनुभव



सिडको । खाद्य महोत्सवासाठी सज्ज असलेले व्यवस्थापन व स्वयंपाकी.

**सिडको ।** पारंपरिक गुजराती चव आणि सौराष्ट्रच्या खाद्यसंस्कृतीचा गंध नाशिकमध्ये दरवळतोय. एक्सप्रेस इन हॉटेलमधील 'आस्टर' या खुल्या भोजनस्थळी 'स्वाद काठियावाडचा' या खास जेवण महोत्सवाची रंगत सुरू झाली आहे. २५ एप्रिलपासून ४ मेपर्यंत दररोज संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होणारा हा महोत्सव नाशिककरांना सौराष्ट्रातील पारंपरिक आणि गावरान चवांचा खास अनुभव देतो आहे.

प्रसिद्ध स्वयंपाकतज्ञ प्रताप चहर यांच्या मार्गदर्शनाखाली पूनम देढिया यांनी साकारलेला हा महोत्सव, केवळ अन्न नव्हे तर संस्कृती, परंपरा आणि प्रेमाने साजरे केलेले एक खाद्यपर्व आहे. रिंगणा नो ओलो (धुरकट वांग्याची भाजी), कुरकुरीत थेपला, लसणिया बटेटा (तिखट बटाट्याची भाजी), बाजरीचा रोटलो (तूप, लोणी व गूळासोबत) असे अस्सल गुजराती पदार्थ पाहुण्यांना थेट तयार करून गरमागरम दिले जात आहेत. महोत्सवाच्या ठिकाणी पारंपरिक गुजराती वातावरणाची रचना करण्यात आली आहे. मातीची भांडी, कंदील, पारंपरिक पोशाखातील कर्मचारी, फोक आर्टचे फलक आणि थेट वाजवले जाणारे लोकवाद्य यामुळे पाहुण्यांना एका खास सांस्कृतिक प्रवासाचा अनुभव मिळतो आहे. जीएम संजय रामनंद यांच्या मार्गदर्शनाखाली जनसंपर्क अधिकारी केविन संचेती, व्यवस्थापक प्रणव ज्योती, इस्माईल शेख आणि शेफ पूनम देढिया, प्रताप चहर यांच्या सहभागाने हा महोत्सव अधिकच आकर्षक बनला आहे.

## आजोबासह नातवानेही केला जलतरणात पराक्रम

**नाशिक ।** येथील उत्कृष्ट सायकलिस्ट, रनर, स्वीमर दीपक भोसले व त्यांचा चार वर्षाचा नातू सचित चैतन्य भोसले या जोडीने अरब सागरात



जलतरण स्पर्धेत भाग घेऊन एक अनोखा पराक्रम केला. श्री दुर्गामाता कला, क्रीडा व संस्कृती मंडळाने विजयदुर्ग (सिंधुदुर्ग) यांनी जलतरण स्पर्धा आयोजित केली होती. ह्या स्पर्धे मध्ये दीपक भोसले ह्यांनी २००० मी (२ कि. मी.) तर नातू सचित ने ५०० मीटर आपापल्या वयोगटात पोहून विक्रमी कामगिरी केली. ह्या स्पर्धेत राज्यभरातून अनेक जलतरणपटूंनी भाग घेतला होता. आजपर्यंत या आजोबा व नातू यांनी अनेक विक्रम केले आहे. नाशिकमध्ये आजोबा व नातूंनी जलतरण स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल जलतरून पट्टू व सायकलिस्ट यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना निवडणूक : अध्यक्षांसह दहा कार्यकारिणी सदस्यांसाठी ३ मे रोजी मतदान

### सहसचिवपदी योगेश हिरे, चंद्रशेखर दंदणे बिनविरोध

**नाशिक ।** नाशिक जिल्हा क्रिकेटब असोसिएशनच्या सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठीच्या निवडणूक कार्यक्रमानुसार नामांकन अर्जाची माघारी प्रक्रिया गुरुवारी पार पडली. त्यानुसार चार पदाधिकारी व तीन निवड समिति सदस्य पदाकरिता असे एकूण सात पदाधिकारी पुढीलप्रमाणे बिनविरोध निवडून आले आहेत. आता अध्यक्ष पदासह दहा कार्यकारिणी सदस्य पदांच्या निवडीसाठी दि. ३ मे रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.





बिनविरोध निवड झालेले पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य पुढीलप्रमाणे- सचिव- समीर रकटे, खजिनदार- हेमंत देशपांडे, सहसचिव- योगेश (मुन्ना) हिरे, चंद्रशेखर दंदणे. निवड समिती सदस्य- सतीश गायकवाड, तरुण गुप्ता, फैय्याज गंजीफ्रॉकवाला असे आहेत. मात्र, अध्यक्षपदाकरिता दोन व कार्यकारिणी सदस्यांच्या १० पदांसाठी माघारीनंतर १३ अर्ज राहिल्याने दि. ३ मे रोजी मतदान घेण्यात येणार आहे. अन्नपूर्णा सभागृह, नंदनवन लॉन्स, मते नर्सरी रोड, सावरकर नगर, गंगापूर रोड , नाशिक येथे सकाळी ८.३० ते ५ वाजेपर्यंत मतदान होईल. अध्यक्षपदाकरिता धनपाल (विनोद) मोतीलाल शहा (खेळाडू पॅनल- चिन्ह रोडरोलर) व महेश झुंजार आव्हाड- वैयक्तिक- चिन्ह बॅट्समन असे दोघे रिंगणात आहेत. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या या निवडणुकीसाठी ॲड. मनीष लोणारी आणि असोसिएट्स निवडणूक अधिकारी म्हणून काम पहात आहेत.

## पाथर्डी उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास महावितरण प्रशासनाकडून मान्यता

### आ. सीमा हिरे यांच्या पाठपुराव्याला यश

**सिडको ।** पाथर्डी येथे प्रस्तावित असलेल्या उपविभाग कार्यालयाला मान्यता मिळावी यासाठीच्या आ.हिरेंच्या सततच्या प्रयनांना आज यश आले आहे.आमदार हिरेंकडून सुरू असलेल्या पाठपुराव्याची गंभीर दखल घेवून राज्याच्या महावितरण प्रशासनाने पाथर्डी येथील प्रस्तावित उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. यामुळे पाथर्डी येथे लवकर महावितरणचे कार्यालय सुरू होणार असून विजेच्या समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा आणि पाथर्डी येथील नागरिकांना व्दारका सबस्टेशनला जाण्याची गरज भासणार नाही.

पश्चिम मतदारसंघातील दहा सेक्शन पैकी कामटवाडा आणि पाथर्डी हे सेक्शन व्दारका उपविभागातंर्गत येतात. खंडित विजपुरवठा सुरळीत करणेकामी वा विजेसंदर्भातील समस्या सोडविण्यासाठी कामटवाडा, पाथर्डी परिसरातील नागरिकांना दहा किलोमिटर दूर अंतरावरील ०दारका सबस्टेशनला जावे



लागत असल्याने नागरिकांची मोठी कुंचबना होत होती.यातून नागरिकांना दिलासा देण्यासाठी स्थानिक महावितरण विभागाने पाथर्डी येथे नवीन उपविभाग कार्यालय प्रस्तावित केले होते. या संदर्भातील मान्यतेसाठी मुंबई येथील महावितरण कार्यालयात पाठविलेला प्रस्ताव गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित होता.

पाथर्डी उपविभाग कार्यालयाचा प्रस्ताव मार्गी लावण्याची विनंती महिनाभरापूर्वी आ.हिरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली होती.त्यानंतर चार दिवसांपूर्वी सीमा हिरेंनी चार दिवसांपूर्वी महावितरणचे संचालक अरविंद भादीकर यांची भेट घेतली होती.कामटवाडा आणि पाथर्डी या दोनही सेक्शनतंर्गत ग्राहकांची संख्या प्रत्येकी तीस ते पस्तीस हजाराच्यावर गेलेली असल्याने महावितरण कंपनीकडून ग्राहकांना पुरेसी सेवा देणे शक्य होत नाही.ग्राहकांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याने अनेकदा येथील सेवा कोलमडून पडत असते. खंडित विजपुरवठा सुरळीत करण्यासाठी आणि विजेसंदर्भातील तक्रारी वा समस्या सोडविण्यासाठी नागरिकांना तब्बल दहा किलोमिटर अंतरावरील व्दारका सबस्टेशन कार्यालयात यावे लागत असल्याचे आ.हिरेंनी संचालक भादीकर यांच्या निदर्शनास आणून दिले होते. आमदार हिरेंनी पोटतिडकीने मांडलेल्या व्यथा आणि सततच्या पाठपुराव्याची दखल घेत राज्याच्या महावितरण प्रशासनाने पाथर्डी येथील प्रस्तावित उपविभाग कार्यालयाच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.




# ‘[illegible]-ए-[illegible]’ [illegible] ‘[illegible]’?

[illegible] (ISIS) [illegible] ISIS-K [illegible]



[illegible]

# [illegible] ?

[illegible]

# [illegible] !



[illegible] ९९२२५४[illegible]९५

[illegible]

# [illegible]



[illegible]

# [illegible]



[illegible] ९[illegible]५५९[illegible]०

[illegible]







NSE: SWIGGY / BSE: 544285

Q4FY25



Snapdragon 6 Gen 4

80W SuperVooC


7000mAh

Snapdragon6Gen4

Qualcomm

Snapdragon6Gen4

# शब्दकोडे क्रमांक २०९६



**आडवे शब्द :-**


१) -- --- -- --- - - ---, होते कुरुप वेडे पिल्लू तळ्यात एक एक गीत
११) कापणारा(इं.)
१२) सोन्याचा धागा
१३) व्रत
१४) मोजणी
१५) पांढुरका रंग
१७) कबर
१९) सहकार्य न करणे
२१) पाप
२२) तल्लिन, तादाम्य
२३) ऊंट हाकणारा
२४) प्रेत
२५) माया, प्रेम
२६) खण, रकाना
२७) अथवा, किंवा
२८) पिकांवर पडणारा एक रोग
३०) सुट्टीचा वार
३३) रसाळ
३६) धोका
३८) चेष्टेत नर्तक
४०) पहारेकरी
४३) मत्स्य,
४५) पाहिले, अवलोकिलेले
४६) गोमाता
४८) आरक्षित
५०) माल साठविण्याची जागा
५२) मित्र
५४) निष्णांत, वाकबगार
५५) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५६) कहाणीतील गाव
५९) बडबड, त्रास
६१) घट्ट मारलेला विळखा
६३) पाक तयार करताना साखरेतून निघणारा मळ
६४) जन्म
६६) पत्त्यातील जोडपे
६७) दुष्ट
६९) अंगाची होणारी आग
७०) गजवदन
७१) वंदनाचा एक शब्द
७२) मंत्रीमंडळ
७३) सगळीकडे
७४) पर्ण

**उभे शब्द :-**

१) पहिला आकडा
२) खर्चात कपात
३) होडी
४) डेरेदार वृक्ष
५) तृतीया
६) भरभराट
७) सुगंधी काटेरी पिवळसर पान
८) वेडा
९) चंद्र
१०) बैलगाडी
१४) घर
१६) दागदागिने
१७) माझा
१८) सतरंजी
१९) असामान्य
२०) नगरपाल
२१) अग्नी
२२) एक तारवाद्य
२९) रूक्ष
३१) च्या शिवाय
३२) बडबड्या, फुशारक्या मारणारा
३४) अतिशय रूक्षता, अतिशय भूक
३५) आजच्या आधीचा दिवस
३७) मुंबईचा घरगडी
३९) वर वधू मधील पडदा
४१) मुक्काम
४२) बायको
४४) शिकारीचा प्राणी
४९) वरवरचे
५१) दोन नद्यांमधील प्रदेश
५२) जोरदारपणे
५३) उपकार
५५) पुष्पदल
५७) व्यापारी फायदा
५८) मुसलमानांचा उपवासाचा महिना
६०) घोडागाडी
६२) फणसातील खाद्यभाग
६४) विष
६५) एक फूल
६६) वन्य
६७) केरसुणी
६८) आयुष्य
६९) सेवक
७१) रजनी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# शेतकरी-व्यापाऱ्यांसाठी 'ॲग्रीबिड ट्रॅकर' प्रणाली

## मविप्र राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकच्या विद्यार्थिनींचे अनोखे संशोधन

**नाशिक ।** शेतकऱ्यांच्या शेती मालाला खुली, निष्पक्ष आणि प्रभावी बाजारपेठ मिळावी, योग्य बाजारभाव मिळावा आणि शेतकऱ्यांची फसवणूक टळावी या उद्देशाने मविप्र संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकमधील डिप्लोमाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी ॲग्रीबिड ट्रॅकर ऑनलाइन प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना घरबसल्या लिलावामध्ये सहभागी होता येणार असून, स्वतंत्रपणे बोलीदेखील लावता येणार आहे. त्यामुळे ही प्रणाली शेतकरी आणि व्यापाऱ्यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा ठरणार आहे.



आजच्या बाजारपेठांमध्ये कृषी उत्पादने खरेदी आणि विक्री करण्याच्या पारंपरिक पद्धती शेतकरी आणि व्यापारी या दोघांसाठीही अनेकदा अडचणीच्या ठरतात. सध्याच्या बाजार यंत्रणेत बाजारपेठेतील मर्यादित उपलब्धता आणि पारदर्शकतेचा अभाव यासारख्या त्रुटींमुळे कृषी मालाच्या खरेदी-विक्रीमध्ये अडथळा निर्माण होतो. शिवाय, शेतकऱ्यांना अनेकदा त्यांचा माल ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. साहजिकच शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाचा योग्य भाव मिळत नाही आणि बाजारपेठेत अकार्यक्षमता निर्माण होते. 'ॲग्रीबिड ट्रॅकर' या ऑनलाइन प्रणालीच्या माध्यमातून थेट लिलावाद्वारे शेतकरी आणि व्यापारी जोडले जाणार आहेत. एकंदरीतच, शेतकऱ्यांना सध्याच्या तंत्रज्ञानाची ओळख करून देणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. देशाचा सर्वांगीण विकास होत असताना ग्रामीण भागात अनेक कारणांमुळे विकास पोहोचू शकत नाही. म्हणूनच ही तफावत दूर करण्यासाठी ॲग्रीबिड ट्रॅकर प्रणाली तयार केली आहे. या नवकल्पनात्मक प्रकल्पाबद्दल मविप्रच्या समस्त पदाधिकारी, सर्व संचालक मंडळ, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य आणि शिक्षणाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### अशी आहे प्रणाली

अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि माहिती विश्लेषणाचा वापर करून ॲग्रीबिड ट्रॅकर हे एक नावीन्यपूर्ण कृषी बोली व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. प्रवेश व्यवस्थापन आणि कृषीमाल पडताळणी यासारख्या सुरक्षेचा समावेश यामध्ये केला आहे. इंटरनेटशी जोडली गेलेली ही प्रणाली शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी एक नावीन्यपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. कृषी उत्पादन साखळीत स्पर्धात्मक वातावरणाला प्रोत्साहन मिळून शेतकऱ्यांना सक्षम होण्यास मदत होणार आहे. डेटा सुरक्षिततेवर भर देऊन आर्थिक व्यवहारांचे संरक्षण करण्यासाठीही उपाययोजना केल्या आहेत. शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन बाजारपेठेत नेण्याआधीच घरबसल्या योग्य भाव मिळणार असून, वाहतूक खर्चामध्येही बचत होणार आहे.

**'युरेका आयडिया पिचिंग' स्पर्धेत प्रथम क्रमांक**

या प्रकल्पासाठी तृतीय वर्षाच्या रिया भामरे, सिद्धी बागूल, सिद्धी चोथे व अनुश्री जाधव या विद्यार्थिनींनी साकारलेल्या प्रकल्पासाठी प्राचार्य प्रशांत पाटील, प्रकल्प समन्वयक रचना पाटील, विभागप्रमुख प्रसाद बोरस्ते यांचे मार्गदर्शन लाभले. पीव्हीजी कॉलेजमध्ये आयोजित 'युरेका आयडिया पिचिंग' स्पर्धेमध्ये ॲग्रीबिड ट्रॅकरने प्रथम क्रमांक मिळवला. तसेच या विद्यार्थिनींना आयआयटी बॉम्बे येथे त्यांचा प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली आहे.

**कृषी उत्पादनांची स्वतंत्रपणे बोली लावता येणार**

शेतकरी, व्यापारी आणि प्रशासकांच्या भूमिका स्पष्ट करून त्यांच्या व्यवस्थापनाचे कामही यात होणार आहे. 'स्वयंचलित बोली' हे या प्रणालीचे वैशिष्ट्य आहे. याद्वारे शेतकरी आपल्या उत्पादनांची स्वतंत्रपणे बोली लावू शकणार आहेत. त्यामुळे कृषिमालाची निकोप स्पर्धा होऊन उत्तम कृषिमाल विक्री होऊ शकेल.

## महत्त्वाचे

### राठोड, हारगावकर यांचा प्रमाणपत्र देवून गौरव

**नगरसुल ।** येवला तालुक्याच्या उत्तर पूर्व भागात माळरानावर राजापूर, ममदापूर, रेंडाळा





सह विस्तीर्ण वनक्षेत्रात हरीण, काळवीट, निलगाय, ससे असे वन्यप्राणी व विविध पक्षी पक्ष्यांसाठी प्रसिद्ध असलेले ममदापूर वनसंवर्धन क्षेत्र वनविभागाने पर्यटकांसाठी आकर्षित केलेले आहे. येवला तालुक्यापासून वीस-बावीस किलोमीटर अंतरावर असलेल्या राजापूरपासून जवळ असलेल्या विस्तीर्ण सपाट जंगलात वनविभागाने ममदापूर वनसंवर्धन क्षेत्र विकसित केले असून, या भागात वन्य प्राण्यांना व हरणांसाठी गवत विविध प्रजातींचे गवत नर्सरीत विकसित करून त्याचे विविध भागात लागवड करून जतन केले आहे. हे गवत भित्र्या हरीण, काळवीट, ससे निलगाय आशा प्राण्यांना गवत उपलब्ध केले व नर्सरीमध्ये गवताची रोपे तयार करून इतर भागातही त्याची वाटप केली. तसेच या वनसंवर्धन क्षेत्रात पाणथळीच्या ठिकाणी गवताची लागवड करून या प्राण्यांना अन्न उपलब्ध करून दिले. त्या अनुषंगाने नासिक वनविभागाचे मुख्य वनसंरक्षक मल्लिकार्जुन जी व नाशिक पूर्वचे उपवनसंरक्षक उमेश वावरे यांनी येवला वनविभागाचे ममदापूर वनसंवर्धन क्षेत्राचे वनरक्षक गोपाल राठोड व वनरक्षक गोपाल हरगावकर यांना कुरण विकासाच्या कामा त उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना शैलेशजी टेंभुर्णीकर प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर व प्रवीण चव्हाण प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांच्या हस्ते महा कॉम्पा महाराज राज्य यांच्या हस्ते नासिक येथे प्रधान करण्यात आले.

### पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत मुक्त विद्यापीठास रौप्यपदक

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले आहे. गेल्या दिनांक ४ ते ०७ एप्रिल २०२५ दरम्यान जम्मू



काश्मीरच्या श्रीनगर येथील काश्मीर विद्यापीठ येथे सदर स्पर्धा संपन्न झाली. त्यात विद्यापीठाच्या सेजल विश्वनाथ मोईकर या विद्यार्थिनीने ७६ किलो वजनी गटात विद्यापीठास हे यश मिळवून दिले. ती विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रांतर्गत असलेल्या तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाची प्रथम वर्ष बी. ए. ची विद्यार्थिनी आहे. तिला विद्यापीठ क्रीडा समन्वयक सिध्दांत टाक यांचे मार्गदर्शन लाभले. सदर यशाबद्दल सेजल मोईकर या विद्यार्थिनीचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, सिका संचालक डॉ. मधुकर शेवाळे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड, विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र संचालक प्रा. दयाराम पवार, जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे व सर्व विद्याशाखा संचालक यांनी अभिनंदनकेले आहे.

### अपंग संघटनेच्यावतीने हेमंत धात्रक यांचा सत्कार

**नाशिक ।** दि नासिक मर्चन्ट्स को- ऑप. बँकेच्या चेअरमनपदी क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण संस्थेचे सरचिटणीस



हेमंत धात्रक यांची बिनविरोध निवड झाली. गुरुवारी (दि. २४) बँकेच्या प्रशासकीय इमारतीत निवड प्रक्रिया पार पडली. धात्रक यांच्याकडे तिसऱ्यांदा बँकेची धुरा सोपविण्यात आली आहे. यावेळी अपंग संघटनेच्यावतीने धात्रक यांचा चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी अधिकारी संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे तसेच ॲड. नीलेश सानप यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत शुभेच्छा दिल्या.

## इगतपुरी भाजपा तालुकाध्यक्षपदी हनुमंत निसरड यांची निवड



**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागातील घोटी खुर्द (रोंगटेवाडी) येथील हनुमंत निसरड यांची भारतीय जनता पार्टीच्या इगतपुरी तालुकाध्यक्ष पदी निवड झाली.

त्र्यंबकेश्वरचे माजी नगराध्यक्ष सुनील अडसरे यांनी निवड प्रक्रिया केली. पूर्वभागात सदर पद मिळाल्याने नांदगाव बुद्रुक विविध कार्यकारी संस्थेचे माजी चेअरमन दादाभाऊ शिरसाठ यांच्यासह कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपच्या विधासभा अध्यक्ष सीमाताई झोले, अण्णा डोंगरे, भाऊसाहेब कडभाने, तानाजी जाधव, संजय झनकर, रमेश मामा निसरड भरत रायकर, गणेश सूर्यवंशी, बबन बांबळे, दशरथ भवारी, विश्वास निसरड, किसन आवारी, गणेश भोईर, देविदास भोईर, भरत जाधव, जगन आवारी, संदीप म्हसळे, नितीन म्हसळे, शिवा बांगर, प्रकाश गवारी, लकी सोनवणे आदी उपस्थित होते. पक्षवाढीसाठी योगदान देणार असल्याचे श्री. निसरड यांनी सांगितले.

## नासिक मीनका गोल्फ कप २०२५ स्पर्धेमध्ये नाशिकच्या मुलाचा गवगवा

**नाशिक ।** शुक्रवारपासून निफाड येथील रिव्हर साईड गोल्फ कोर्स येथे सुरू झालेली मीनका गोल्फ कप २०२५ या स्पर्धेला मिनका रिव्हर्डेलच्या अधिकारी फ्लॉरेन्स सालढाणा यांच्या प्रमुख उपस्थितीत मुलांच्या गटातील सामन्यांना सुरुवात झाली.



एकूण या गटामध्ये बारा स्पर्धक सहभागी झाले होते. यापैकी नाशिक जिल्ह्यातील दहा व मुंबई येथील दोन स्पर्धक सहभागी झाले होते. खेळ सुरू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात नाशिकच्या शुभम आणि मुंबईचा ईशान यांच्यात नऊ होलपर्यंत हा सामना अतिशय चुरशीचा व बरोबरीत संपला. त्यानंतर ही बरोबरी सोडविण्यासाठी पुढे तीन होल खेळविण्यात आले. रंगतदार ठरलेल्या या सामन्यात शुभमने एका स्ट्रोकने वरील बरोबरी सोडवली व आपले नाव विजेतेपदावर निश्चित केले. दुसऱ्या स्थानावर मुंबईच्या ईशांत शिखरे याने आपले उपविजेते पद निश्चित केले. ईशांत शिकरे हा मागील वर्षीचा विजेता आहे.

## दहशतवादी हल्ल्यातील मृतांना नाशिक सायकलिस्टतर्फे श्रद्धांजली

### फाउंडेशनतर्फे मेणबत्ती प्रज्वलित करून यशवंत महाराज पटांगण येथे श्रद्धांजली

**नाशिक ।** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे भारतीय पर्यटकांवर झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या निरपराध नागरिकांना नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्यावतीने मेणबत्ती प्रज्वलित करून श्री यशवंतराव महाराज पटांगण, गंगा घाट पंचवटी येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



२२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर अंदाधुंद गोळीबार केला, ज्यात २८ निष्पाप भारतीय पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना प्रत्येक भारतीयांच्या मनाला अतिशय वेदना देणारी आहे. या हल्ल्याने संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली असून, या घटनेचा संपूर्ण देशभरातून तीव्र निषेध होत आहे.

नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे सदस्य आपल्या निवासस्थानातून सायकलिंग करत सायंकाळी सात वाजता यशवंत महाराज पटांगण येथे मोठ्या संख्येने जमले. सर्वांनी दहशतवादी हल्ल्याचा निषेध म्हणून पोस्टर हातात घेतले. या पोस्टरवर 'आतंकवाद नही सहेंगे', 'दहशतवादी संघटना मुर्दाबाद', 'पहलगाम भ्याड हल्ल्याचा निषेध', 'इंडिया विल नॉट फॉरगीव्ह' हे संदेश दिले. व शांततेच्या मार्गाने मेणबत्ती प्रज्वलित करून भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप पर्यटकांच्या आत्म्यास शांती लाभावी यासाठी प्रार्थना केली. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर काळे, सचिव संजय पवार, उपाध्यक्ष डॉ. मनिषा रौंदळ, माजी उपाध्यक्ष चंद्रकांत नाईक, माजी खजिनदार रवींद्र दुसाने, संचालक प्रवीण कोकाटे, माधुरी गडाख व इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेहेलगाम येथील हल्ल्याचा चांदवड भाजपतर्फे जाहीर निषेध




**चांदवड ।** जम्मू -कश्मीरमधील पेहेलगाम येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी हिंदू भारतीय पर्यटकांवर भ्याड हल्ला करून निष्पाप २८ भारतीय नागरिकांना मृत्युमुखी पाडले. त्या घटनेचा जाहीरपणे निषेध करीत भारतीय जनता पार्टी चांदवड तालुक्याच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले.

केंद्र सरकारने कठोर पावले उचलून दहशतवाद्यांना कंठस्नान घालावे कारण की २८ भारतीय नागरिकांना धर्म विचारून अमानुषपणे गोळ्या झाडून मारण्यात आले आहे. हा दहशतवादी हल्ला घडवून आणणाऱ्या संघटनेच्या दहशतवाद्यांना कठोरातील कठोर शासन झाले पाहिजे, अशा मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक ( चांदवड पोलीस स्टेशन ) यांना देण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीतर्फे भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व हिंदू पर्यटक बांधवांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी भाजपचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुकाध्यक्ष मनोज शिंदे, विठ्ठल आवारे, संतोष ढोमसे, राहुल हांडगे, जितेंद्र डोंगरवार, देविदास महाले, अंकुश ठाकरे, अशोक कावळे, मुकेश आहेर, एड. कल्याणी कुलकर्णी, संजय चौबे, गणेश ठाकरे, खुशाल ललवाणी, मोहित आहेर, संजय पाडवी, सुरेश पाटील, मोहन काका शर्मा , बाळासाहेब वाघ, पिंटू भोईटे, सुशील पलोड, बाळासाहेब जाधव, कैलास गुंजाळ, देवा पाटील, राजाभाऊ आहेर, किशोर क्षत्रिय, महेश खंदारे, कृष्णा कोकणे, बबन दरेकर, गीताताई झाल्टे, कैलास खैरे, विकास घुले, आत्माराम खताळ, नीलेश काळे आदी पदाधिकारीउपस्थितहोते.

## उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमेत नाशिक सायकलिस्टने दिला पर्यावरण संवर्धनासह स्वच्छतेचा संदेश

**नाशिक ।** नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनचे सक्रिय सदस्य गणेश लोहार यांनी मागील आठवड्यात सायकलवर उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमा केली. ते बघून उत्तर वहिनी नर्मदा परिक्रमेची माहिती मिळाली. नर्मदा माई ही रामपुरा ते तिलकवाडा या दरम्यान आपला पूर्व ते पश्चिम हा मार्ग सोडून उत्तर दिशेने वाहते आणि नंतर तिचा प्रवाह पूर्ववत होतो. रामपुरा ते तिलक वाडा व परत तिलक वाडा ते रामपुरा हा साधारण २१ किलोमीटर मार्गावर नर्मदेच्या तीरावरून केल्या जाणाऱ्या परिक्रमेला उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमा असे म्हटले जाते.

नर्मदा माईची पूर्ण परिक्रमा करणे प्रत्येकाला जमेलच असे नसते. त्यासाठी चैत्र महिन्यात उत्तर वाहिनी नर्मदा परिक्रमा केल्यास पूर्ण परिक्रमा करण्याचे पुण्य लाभते. संपूर्ण चैत्र महिन्यात गुढीपाडवा ते चैत्र अमावस्यापर्यंत ही परिक्रमा करता येते. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्या उपाध्यक्ष डॉ.मनिषा रौंदळ, माजी उपाध्यक्ष चंद्रकांत नाईक, संचालक माधुरी गडाख, सक्रिय सदस्य मोहन देसाई, दविंदर भेला, डॉ. नितीन रौंदळ, विजय गडाख, अनिता देसाई, साधना दुसाने, वैशाली शेलार, संगीता गडकरी, परमजीत भेला या सदस्यांनी गाडीने नाशिकवरून 19 एप्रिल रोजी दुपारी प्रस्थान केले. सायंकाळी स्वामी रामानंद आश्रम रामपूर येथे रात्री पोहोचले. थोडी विश्रांती करून सकाळी ब्रह्म मुहूर्तावर चार वाजता नर्मदेच्या घाटावर स्नान, संकल्प करून नर्मदामैयाचे आशीर्वाद घेऊन परिक्रमेस सुरुवात केली. "जल ही जीवन है", "स्वच्छ जल पवित्र मन, "स्वच्छ नर्मदा, निर्मल नर्मदा", "पेड लगाओ पेड बचाओ" हे संदेश बोर्ड घेऊन नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनच्यावतीने परिक्रमा मार्गात संदेश दिला. येथील प्रशासनाच्या वतीने अतिशय छान व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्रशस्त लाईट, स्वागत कमान, मार्गात अनेक ठिकाणी विश्रांतीसाठी मॅट, रामपुरा येथून नदी ओलांडण्यासाठी तात्पुरता पूल बांधण्यात आलेला आहे. मार्गात ठिकठिकाणी गुजरात सरकार, ग्रामस्थ सामाजिक कार्यकर्ते व आश्रम यांच्यावतीने महाप्रसाद, थंड पेय, फळे मिठाईचे आयोजन करण्यात आलेले आहे. भाविकांना थकवा जाणवू नये व उत्साहवर्धक वातावरणासाठी लाऊड स्पीकर द्वारे नर्मदा मैयाचे भावगीते कानावर पडतात व सहजरीत्या पाऊल पुढे चालतात. संपूर्ण भारतातून ठिकठिकाणावरून भाविक परिक्रमेसाठी येतात. प्रचंड गर्दी असून सर्वजण शिस्तीचे पालन करताना दिसले. पूर्ण मार्गात प्रशासन व स्वयंसेवकांच्या वतीने स्वच्छतेची अतिशय छान दक्षता घेतली जात होती.



ठिकठिकाणी स्वच्छतागृह आहेत. ही परिक्रमा करताना नंदी घाटावर फोटोग्राफीचा आनंद सुखदादायक ठरला. तिलकवाडा येथे नदी ओलांडून जाण्यासाठी बोटिंगची व्यवस्था केलेली आहे. तसेच या घाटावर स्नानासाठी शॉवर ची देखील व्यवस्था केली आहे. रणछोडदास मंदिर येथे दर्शन घेऊन थोडी विश्रांती घेऊन पुनश्या मार्गस्थ झालो. नऊ वाजता ही परिक्रमा पूर्ण केली. साधारण ही परिक्रमा पूर्ण करण्यास पाच ते सहा तासाचा कालावधी लागतो. येत्या २७ एप्रिल पर्यंत ही परिक्रमा चालू आहे.

# बालांगण

## मानवजातीच्या रक्षणासाठी...




विचार करा

**मि**त्रांनो, सध्या तुम्ही एआय म्हणजेच कृत्रीम बुद्धिमत्तेबद्दल बरेच काही ऐकत, वाचत असाल. काळानुरुप हे तंत्रज्ञान अधिकाधिक विकसित होणार आहे. भविष्यात तर मानवासारखा विचार करणारे आणि सगळे काही समजून घेणारे कृत्रिम जनरल इंटेलिजेंस अर्थात एजीआय विकसित होऊ शकते असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. ही बाब मानवतेसाठी कायमचा धोकादेखील बनू शकते.

गुगलच्या एका नवीन रिसर्च पेपरमध्ये हे सांगण्यात आले आहे. संशोधनात दावा करण्यात आला आहे की, २०३० पर्यंत एजीआय विकसित झाले आणि त्यावर योग्यरित्या नियंत्रण ठेवले नाही तर ते मानवजातीचा कायमचा नाश करू शकते. एजीआयचा समाजावर मोठा परिणाम होऊ शकतो आणि त्यामुळे गंभीर नुकसान होऊ शकते किंवा मानवाच्या अस्तित्वावर संकट देखील येऊ शकते असेही काहींचे मत आहे. म्हणूनच आत्तापासूनच सावधगिरीचे उपाय आणि सुरक्षा धोरणांची माहिती घ्यायला हवी.

येत्या काळातील मुख्य धोके म्हणजे एकतर चुकीच्या लोकांकडून चुकीच्या उद्देशाने एजीआयचा वापर होऊ शकतो. तसेच एजीआयची उद्दिष्टे मानवांच्या उद्दिष्टांशी कदाचित न जुळणारी असू शकतात. त्याचबरोबर प्रणालीतील तांत्रिक किंवा नैतिक अपयशामुळे समाजाला काही त्रास सहन करावा लागू शकतो. पुढे जाऊन यामुळे समाजाच्या रचनेवर काही दुष्परिणाम होण्याचा धोकाही नाकारता येत नाही. हे सर्व धोके लक्षात घेता त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आतापासूनच तयारी आवश्यक आहे. पुढील पाच ते १० वर्षांत एजीआय अस्तित्वात येऊ शकते. त्यामुळेच ते विकसित आणि नियंत्रित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेची आवश्यकता असल्याचेही तज्ज्ञ सांगतात. याचे कारण म्हणजे सामान्य एआय फक्त एक विशिष्ट कार्य करण्यासाठी वापरले जाते. चॅटबॉट्स, सर्च इंजिन असा त्याचा आवाका आहे. मात्र आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेंस हे तंत्रज्ञान मानवांप्रमाणे विचार करण्यास, समजून घेण्यास, शिकण्यास आणि निर्णय घेण्यास सक्षम असेल. म्हणूनच ते कोणत्याही एका कार्यापुरते मर्यादित राहणार नाही तर प्रत्येक क्षेत्रात मानवासारखी क्षमता असल्यामुळे ते अधिक घातक ठरु शकेल.



## भौगोलिक वैशिष्ट्ये जपणारा देश

सफर देशांची

**माँ**टेनेग्रो हा दक्षिणपूर्व युरोपातला देश आहे. माँटेनेग्रो म्हणजे 'काळा पर्वत'. अल्बानिया, क्रोएशिया, सर्बिया, बोस्निया हे माँटेनेग्रोचे शेजारी देश आहेत. विसाव्या शतकापर्यंत माँटेनेग्रो हा युगोस्लाव्हियाचा भाग होता. हा खूपच सुंदर देश आहे. इथे भौगोलिक वैविध्य पहायला मिळतं. उंचच उंच पर्वतरांगा, सोनेरी वाळूने नटलेले समुद्रकिनारे आणि इथली टुमदार शहरं पर्यटकांना आकर्षित करतात. २००६ मध्ये माँटेनेग्रो स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. यानंतर या देशाने आर्थिक प्रगतीसाठी बरेच प्रयत्न केले.

'पॉडगॉरिका' ही या देशाची राजधानी आहे. 'माँटेनेग्रीन' ही इथली अधिकृत भाषा आहे. या देशात बऱ्याच पर्वतरांगा आहेत. तसंच इथला काही भाग सपाटही आहे. 'स्कॅडार' हा या देशातला सर्वात मोठा तलाव तर ड्रिना, लिम आणि तारा या प्रमुख नद्या आहेत. या देशात बराच काळ उन्हाळा असतो. इथे उन्हाळ्यात कोरडं वातावरण असतं.

इथला हिवाळा सौम्य असतो. जंगली डुकरं, अस्वलं, हरणं, कोल्हे, लांडगे, रानमांजरं असे बरेच प्राणी इथे आढळतात. काही प्रजातींचे मासे, गोगलगायी आणि किटक फक्त माँटेनेग्रोमध्येच आढळतात. इथे विविध प्रकारची झाडंही आहेत. हा प्रदेश पंधाराव्या शतकापासून माँटेनेग्रो म्हणून ओळखला जातो. या देशात विविध प्रकारचे उद्योग आहेत. स्टीलनिर्मिती, ॲल्युमिनियमशी संबंधित उद्योग, शेतमालावर प्रक्रिया करणं आणि पर्यटन हे इथले प्रमुख उद्योग आहेत. बटाटे, आंबट फळं, धान्यं, ऑलिव्ह ही पिकं इथे घेतली जातात.

## लिंबूपाणी प्या, ऊर्जा मिळवा

**छो**ट्या दोस्तांनो, उन्हाळ्यात खूप तहान लागते. मग तुम्ही थंड सॉफ्टड्रिंकसाठी हट्ट करता. पण त्यामध्ये आरोग्यास हानिकारक ठरणारे अनेक घटक असतात. म्हणूनच जास्त प्रमाणात शीतपेये घेणे टाळा. त्याऐवजी या कडक उन्हात तुम्ही लिंबूपाणी पिऊ शकता. तुम्ही संध्याकाळपर्यंत लिंबू पाणी प्यायले तर उन्हाचा त्रास कमी होतो कारण हे पेय केवळ तहान भागवत नाही तर आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. चला तर मग, याविषयी अधिक जाणून घेऊ या.



स्टे फिट


मित्रांनो, लिंबामध्ये व्हिटॅमिन सी, ॲंटिऑक्सिडंट्स आणि इलेक्ट्रोलाइट्स भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराला ऊर्जा प्रदान करतात. तुम्ही दिवसभर वेगवेगळ्या प्रकारे घेऊ शकता. जसे की, सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्यात लिंबू आणि मध मिसळून प्यायल्याने पचनसंस्था सक्रिय होते. नियमित हा नियम पाळला तर शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडून चयापचय सुधारण्यास मदत होते. रिकाम्या पोटी लिंबूपाणी पिल्याने वजन कमी होण्यासही मदत होते.

* जेवणापूर्वी लिंबूपाणी प्यायल्यास पाचकस्त्राव सक्रिय होतो आणि अन्न चांगले पचते.

* व्यायाम केल्यानंतर किंवा उन्हात खेळून आल्यावर लिंबूपाणी पिल्याने शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता भरून निघते. स्वाभाविकच थकवा दूर होतो. तुम्ही लगेचच ताजेतवाने होता.

* दुपारी लिंबूपाणी पिल्याने शरीर हायड्रेट राहते आणि उष्म घाताचा धोका कमी होतो. म्हणूनच दुपारी घरी आल्यावर थंड पाणी पिण्याऐवजी तुम्ही थंड लिंबूपाणी पिऊ शकता.

* रात्री झोपण्यापूर्वी मात्र लिंबूपाणी पिऊ नका, कारण त्यामुळे आम्लपित्ताचा त्रास होता. त्याचबरोबर एकाच वेळा प्रमाणापेक्षा जास्त लिंबूपाणी पिल्याने दातांवरील संरक्षक कोटिंग खराब होऊ शकते. म्हणून हे पाणी स्ट्रॉमधून पिणे चांगले.




## अंतराळाचे अंतरंग

**मु**लांनो, अंतराळात अनेक रहस्यं दडली आहेत. आपली सूर्यमाला, आकाशातले तारे, धूमकेतू याबद्दल तुम्हालाही कुतूहल असेल. आपला भारतही अंतराळ संशोधन क्षेत्रात प्रगती करतो आहे. अवकाशाबद्दल कितीही जाणून घेतलं तरी कमीच पडेल. म्हणूनच अवकाशाबद्दलची ही रंजक माहिती खास तुमच्यासाठी...


* बुध हा आपल्या सूर्यमालेतला पहिला ग्रह. सूर्याच्या जवळ असल्यामुळे बुध सर्वात उष्ण ग्रह असेल असं आपल्याला वाटतं. पण खरं तर तसं नसतं. कोणत्याही ग्रहावरच्या तापमानावर तिथल्या वातावरणाचा प्रभाव असतो. कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण बरंच जास्त असल्यामुळे शुक्र बुधापेक्षा जास्त उष्ण आहे.

गंमत जंमत

* चीनची भिंत जगातल्या सात आश्चर्यांपैकी एक. ही भिंत चंद्रावरून दिसते असं म्हटलं जातं. पण प्रत्यक्षात कोणतीही मानवनिर्मित वास्तू अंतराळातून दिसत नाही.

* सूर्याचा रंग पिवळा आहे असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात तो पांढऱ्या रंगाचा आहे. प्रखरतेमुळे तो आपल्याला पिवळ्या रंगाचा दिसतो.

* शास्त्रज्ञांना अंतराळ, आपली सूर्यमाला याबद्दल सगळी माहिती आहे, असंही आपल्याला वाटत असतं. पण अंतराळातली बरीच रहस्यं अजूनही उघड झालेली नाहीत.




## असा असतो पिन कोड

जाणून घ्या

**मि**त्रांनो, तुम्ही कधी एखाद्याला पत्र लिहिले किंवा पार्सल पाठवले असेल तर पत्त्यासोबत पिन कोड लिहावा लागला असेल. कारण पिन कोडशिवाय पत्ता अपूर्ण मानला जातो. पण पिन कोड म्हणजे काय, कोणत्याही ठिकाणाच्या पत्त्यामागे हे क्रमांक का लिहिलेले असतात आणि ते कसे सुरू झाले, या प्रश्नांची उत्तरे जाणून घ्यायची आहेत का? तर मग हे नक्की वाचा.

**पिनकोड काय आहे?**

पिन कोडचे पूर्ण नाव 'पोस्टल इंडेक्स नंबर' असे आहे. भारतीय टपाल विभागाने देशातील विविध प्रदेश ओळखण्यासाठी हा सहा अंकी कोड तयार केला आहे. पिन कोडचा उद्देश टपाल सेवा जलद, सुव्यवस्थित आणि अचूक बनवणे हा आहे. यामुळे पत्रे, पार्सल आणि इतर टपाल योग्य ठिकाणी पोहोचवण्यास मदत होते.

**पिन कोडची रचना कशी असते?**

भारताचा पिन कोड सहा अंकांनी बनलेला असून प्रत्येक अंक विशिष्ट भौगोलिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतो.

जसे की, पहिला अंक भारताचा झोन दर्शवतो. आपला संपूर्ण देश एकूण नऊ पोस्टल झोनमध्ये विभागलेला आहे. त्यापैकी आठ प्रादेशिक आहेत आणि नववा विभाग आर्मी (आर्मी पोस्टल सर्व्हिस) साठी आहे. यामध्ये

क्रमांक १ उत्तर प्रदेशसाठी असून यामध्ये दिल्ली, हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर चा समावेश होतो. क्रमांक २ उत्तर प्रदेशसाठी असून त्यात उत्तराखंड, उत्तर प्रदेशचा समावेश होतो. क्रमांक ३ मध्ये देशाचा पश्चिम प्रदेश म्हणजेच राजस्थान, गुजरात समाविष्ट आहेत. क्रमांक ४ मध्ये महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेशचा समावेश होतो. क्रमांक ५ मध्ये दक्षिण प्रदेश अर्थात आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक समाविष्ट होतात. क्रमांक ६ मध्ये केरळ, तामिळनाडूचा समावेश आहे. क्रमांक ७ मध्ये पूर्व प्रदेश म्हणजेच पश्चिम बंगाल, ओडिशा, आसामचा समावेश होतो. क्रमांक ८ मध्ये बिहार आणि झारखंड ही राज्ये येतात तर क्रमांक ९ मध्ये आर्मी पोस्टल सर्व्हिस (एपीओ आणि एफपीओ) चा समावेश होतो.

पिन कोडमधील दुसरा अंक उप-क्षेत्र दर्शवतो. तिसरा अंक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतो आणि शेवटचे तीन अंक विशिष्ट पोस्ट ऑफिस दर्शवतात. उदाहरणार्थ पिनकोड ११०००१ असेल तर १-उत्तर विभाग (दिल्ली) १० - दिल्ली उप-प्रदेश आणि ००१-कॅनॉट प्लेस पोस्ट ऑफिस असा याचा पत्ता असतो.

चित्र रंगवा




## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) अरुणाचल प्रदेशची राजधानी कोणती?
२) 'खासी' ही भारतातल्या कोणत्या राज्याची प्रमुख भाषा आहे.?
३) वॉटर पॉलोच्या एका संघात किती खेळाडू असतात?
४) सौरभ चौधरी कोणता खेळ खेळत असे?
५) सिमोना हालेप कोणत्या स्पर्धेतील विजेती कोण?
६) 'विंग्ज ऑफ फायर' हे कोणाचं आत्मचरित्र आहे?
७) मेघालयचं लोकनृत्य कोणतं?
८) दांडिया हा कोणत्या राज्यातला नृत्यप्रकार आहे?
९) २०१९ मधील जी २० देशांची परिषद कुठे आयोजित करण्यात आली होती?
१०) भारताची पहिली बुलेट ट्रेन कोणत्या दोन शहरांदरम्यान धावणार आहे?

उत्तरं : १) ईटानगर २) मेघालय ३) तीन ४) नेमबाजी ५) विम्बल्डन स्पर्धा ६) डॉ. एपीजे अब्दुल कलाम ७) लोहो ८) गुजरात ९) जपान १०) मुंबई-अहमदाबाद

ठिपके जुळवा



## उपकरण चार्जिंगला लावताय?

काळजी घ्या

**छो**ट्या मित्रांनो... सुट्टीच्या या काळात वा एरवीदेखील तुम्ही स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅब्लेट आणि स्मार्टवॉच यासारखी इलेक्ट्रॉनिक उपकरणे चार्जिंगला लावत असाल. याची गरजच असते. परंतु चुकीच्या चार्जिंग सवयींमुळे बॅटरीचे आयुष्य कमी होऊ शकते तसेच सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच चार्जिंग करताना काही बाबी अवश्य लक्षात ठेवल्या पाहिजेत.

* सगळ्यात पहिली आणि महत्त्वाची बाब म्हणजे नेहमी डिव्हाइससह आलेला चार्जर आणि केबल आणि ती नसेल तर विश्वासार्ह ब्रँडचा प्रमाणित चार्जर वापरा. स्वस्त, ब्रँड नसणारे चार्जर सतत वीज पुरवत नाहीत आणि त्यामुळे बॅटरी खराब होऊ शकते. शॉर्ट सर्किटचाही मोठा धोका असतो.

* आधुनिक उपकरणांना ओव्हरचार्जिंग संरक्षण असते परंतु १००% चार्ज झाल्यानंतरही त्यांना जास्त काळ प्लग इन ठेवणे अजिबात चांगले नाही. रात्रभर चार्जिंग केल्याने उष्णता वाढून बॅटरीवर ताण येऊ शकतो.

* लिथियम बॅटरीसाठी २० ते ८०% चार्ज पातळी सर्वोत्तम असते कारण ही श्रेणी बॅटरीचे आरोग्य राखते आणि तिचे आयुष्य वाढवते.



* उष्णता हा बॅटरीचा सर्वात मोठा शत्रू आहे. म्हणूनच चार्जिंग करताना उपकरण उशीखाली, चादरीत किंवा उन्हात ठेवू नका. तसेच चार्जिंग करताना जड ॲप्स किंवा गेम वापरू नका कारण यामुळेही बॅटरी जास्त गरम होऊ शकते.

* चार्जिंग करताना फोन किंवा लॅपटॉप असामान्यपणे गरम झाला तर ताबडतोब अनप्लग करा. थंड झाल्यावर पुन्हा चार्जिंगला लावा. वारंवार डिव्हाईस गरम होणे हे हार्डवेअर किंवा चार्जरच्या समस्येचे संकेत असू शकते.

* चार्जिंग करताना डिव्हाइसचा जास्त वापर केल्याने उष्णता वाढते आणि चार्जिंगचा वेग कमी होतो. तेव्हा हलका वापर ठीक आहे, पण चार्जिंग सुरू असताना गेमिंग किंवा व्हिडिओ एडिटिंग टाळा.

* चार्जिंग पोर्ट प्लग इन करण्यापूर्वी ते स्वच्छ आणि कोरडे असल्याची खात्री करा. ओलाव्यामुळे शॉर्ट सर्किट होऊ शकते आणि धुळीमुळे चार्जिंग कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

दोस्त हे मस्त

### मधमाश्यांच्या जगात...

मुलांनो, मधमाश्यांमुळे आपल्याला मध मिळतो. तुम्ही बऱ्याच ठिकाणी मधमाश्यांची पोळी बघितली असतील. फुलं असणाऱ्या ठिकाणी मधमाश्या



असतातच. बर्फाळ अंटार्टिका खंड सोडून सगळीकडे मधमाश्या असतात. राणी मधमाशी एकावेळी जवळपास १५०० अंडी घालते. माणसासाठी अन्न निर्माण करणारा मधमाशी हा एकमेव कीटक आहे.

खादाडी

### पनीर ब्रेड डिस्क



काहीतरी वेगळं करायचं असेल तर पनीर ब्रेड डिस्कचा पर्याय आहे. यासाठी आठ ब्रेड स्लाईस, चार चमचे बटर, दोन चमचे टोमॅटो सॉस, एक चमचा ऑरेगानो, एक चमचा ठेचलेला लसूण, पाव कप कुस्करलेलं पनीर, प्रत्येकी दोन चमचे चिरलेला कांदा, टोमॅटो आणि सिमला मिरची, पाव कप चीझ, चमचाभर मिरपूड, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ हे साहित्य घ्या. ब्रेडच्या कडा कापून घ्या. आता सगळ्या ब्रेड्चा मधला भाग गोल आकारात कापून घ्या. मग एका भांड्यात दोन चमचे बटर, टोमॅटो सॉस,ऑरेगानो आणि लसूण घालून मिक्स करा. आता प्रत्येक ब्रेडला हे मिश्रण लावून घ्या. दुसऱ्या भांड्यात कांदा, टोमॅटो, सिमला मिरची, पनीर, चीझ, कोथिंबिर, मिरपूड आणि मीठ हे घटक घाला. मिसळून घ्या. हे मिश्रण चार गोलाकार चकत्यांवर पसरा. त्यावर दुसरी गोलाकार चकती ठेवा. आता तवा घ्या. त्यावर बटर घाला आणि ब्रेड दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. सॉससोबत खा.

स्टडी टिप्स

### लेखनाचा सराव करा

अभ्यासाचा खूप ताण असतो. पण मुलांनो, कधीही कोणत्याही परीक्षांना घाबरायचं काहीच कारण नाही. पेपर वेळेत पूर्ण करण्यासाठी लेखनाचा सराव



करायला सुरूवात करा. तेव्हा आताच्या निवांत वेळी हा सराव करा. यासाठी चांगल्या बॉलपेनची निवड करा. पेनला चांगली ग्रीप असायला हवी. लेखनाच्या सरावामुळे परीक्षेच्या दिवशी तुमच्या हातांवर ताण येणार नाही.

योगा टाईम

### पोटदुखी पळवण्यासाठी...

मुलांनो, अधूनमधून पोट दुखत असेल. अपचनासारख्या तक्रारी उद्भवत असतील. हा त्रास कमी करण्यासाठी विविध प्रकारची योगासनं करता येतील.



जानुशिरासन, उष्ट्रासन, तिर्यक ताडासन, करिचक्रासन या आसनांमुळे पोटाच्या तक्रारी दूर होतात.



# सेंसेक्स, निफ्टीमध्ये सलग दुसऱ्या सत्रात घसरण

## ऑटो, फार्मा शेअर्समुळे दबाव

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

२५ एप्रिल रोजी बेंचमार्क निर्देशांक निफ्टी आणि सेंसेक्स सलग दुसऱ्या सत्रात घसरले, ज्यात १३ पैकी १२ क्षेत्रीय निर्देशांक लाल चिन्हात बंद झाले. फार्मा, मेटल आणि ऑटो शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण झाली, तर आयटी शेअर्स हे एकमेव क्षेत्र राहिले जे काही प्रमाणात बाजाराला आधार देत होते.

सत्राच्या उत्तरार्धात, दोन्ही निर्देशांकांनी दुपारी सुमारे २:४५ च्या सुमारास त्यांच्या सुरुवातीच्या काही तोट्यांची भरपाई केली होती.

सत्र अखेरीस, सेंसेक्स ५८८.९० अंकांनी (०.७४%) घसरून ७९,२१२.५३ वर बंद झाला, तर निफ्टी २०७.३५ अंकांनी (०.८६%) घसरून २४,०३९.३५ वर बंद झाला. सुमारे ६८२ शेअर्स



वधारले, ३१३८ शेअर्स घसरले आणि ११५ शेअर्स स्थिर राहिले.

तज्ज्ञांच्या मते, सध्या बाजार काही सकारात्मक आणि नकारात्मक घटकांमधून वाट काढत आहे. सकारात्मक बाब म्हणजे परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून (FII) मोठ्या प्रमाणात झालेली गुंतवणूक — मागील आठवड्यात एकूण रु. २९,५१३ कोटींची गुंतवणूक झाली आहे — ज्यामुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आहे. यामुळे डॉलर मजबूत होण्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिका शेअर बाजारात होत असलेली गुंतवणूक थांबवून भारताकडे वळण्याची प्रवृत्ती दिसून आली आहे. एफआयआयकडून होत असलेली ही सातत्यपूर्ण गुंतवणूक अल्पकालीन काळात बाजारात मंदीच्या शक्यतेला रोखू शकते.

एक आणखी आशादायक बाब म्हणजे अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेन्ट यांचे विधान, ज्यात त्यांनी भारत

**सेन्सेक्स 79,212**

**निफ्टी 24,039**

अमेरिकेसोबत द्विपक्षीय व्यापार करार करणारा पहिला देश ठरू शकतो असे म्हटले. चीनकडून कमी प्रतिसाद मिळत असताना अमेरिका आपल्या व्यापार भागीदारीचा विस्तार करण्याचा प्रयत्न करत आहे, आणि या पार्श्वभूमीवर भारताचे मजबूत आर्थिक स्थिती हे एक सकारात्मक संकेत आहे.

बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल आज ४२०.८३ लाख कोटी रुपयांवर घसरले, जे मागील व्यापार दिवशी म्हणजे गुरुवार, २४ एप्रिल रोजी ४२९.६३ लाख कोटी रुपयांवरून कमी झाले. तर दुसरीकडे, आज बीएसईमध्ये सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप सुमारे ८.८ लाख कोटी रुपयांनी कमी झाले आहे. याचा अर्थ गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ८.८ लाख रुपयांची घट झाली आहे.

सेन्सेक्समध्ये समाविष्ट असलेल्या ३० कंपन्यांपैकी ६ शेअर्स आज हिरव्या रंगात बंद झाले. यामध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, इन्फोसिस, रिलायन्स इंडस्ट्रीज, एचसीएल टेक, एचडीएफसी बँक आणि आयसीआयसीआय बँकेचे शेअर्स सर्वाधिक वधारले.

# अमेरिका, ब्रिटनसाठी गेली 30 वर्षे पाकिस्तान दहशतवाद पोसतोय; पाकिस्तानी संरक्षण मंत्र्यांचा गौप्यस्फोट

**इस्लामाबाद, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे आता हळू हळू समोर येऊ लागले आहे. हा हल्ला फेब्रुवारीत प्लॅन करण्यात आला होता, असेही स्पष्ट होत आहे. पाकिस्तान आपले हात झाडत असला तरी भारतामध्ये होणाऱ्या प्रत्येक दहशतवादी घटनांमध्ये त्यांचा आजवर हात राहिलेला आहे. कसाब या जिवंत दहशतवाद्याला भारताने पकडले होते. तरीही पाकिस्तान तो आमचा नव्हेच म्हणून सांगत होता. आता पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यानेच टीव्ही मुलाखतीत पाकिस्तान गेली ३० वर्षे अमेरिका आणि ब्रिटनसाठी दहशतवाद पोसत, पसरवत आला आहे, अशी कबुली दिली आहे.

ख्वाजा आसिफ यांनी ब्रिटनच्या स्काय टीव्हीला ही मुलाखत दिली आहे. यात त्यांनी पाकिस्तान दशकांपासून



दहशतवादी संघटनांचे समर्थन, सहाय्य आणि त्यांना फंड देण्यात सहभागी असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तान तीस वर्षांपेक्षा जास्त काळापासून अमेरिकेसाठी हे घाणेरडे काम करत आला आहे, असा गौप्यस्फोट त्यांनी केला आहे.

ख्वाजा यांनी पाकिस्तान एक पीडित असल्याचे भासविण्याचा प्रयत्न केला आहे. दहशतवाद्यांना पैसा पुरविल्याच्या भूमिकेवर विचारण्यात आल्यावर त्यांनी अमेरिका, ब्रिटन आणि पश्चिमी देशांसाठी गेली तीस वर्षे घाणेरडे काम करत आहोत. पाकिस्तानचा हा निर्णय एक मोठी चूक होती त्याचे परिणाम भोगत आहोत, असे त्यांनी म्हटले आहे.

जर आम्ही सोव्हिएत संघाविरोधातील युद्धात सहभागी झालो नसतो तसेच ९/११ च्यानंतर युद्धात सहभागी झालो नसतो तर पाकिस्तानचा रेकॉर्ड डागाळलेले नसते. अमेरिकेसारख्या मोठ्या शक्तींनी पाकिस्तानला दहशतवादासाठी दोषी ठरविणे त्यांच्यासाठी कठीण नाही. आम्ही त्यांच्यासाठी १९८० मध्ये युद्ध लढलो होतो. आताचे हे दहशतवादी वॉशिंग्टनमध्ये झोपत होते, जेवत होते. अमेरिकेने अफगानिस्तानमध्ये सोव्हिएतविरोधात लढण्यासाठी दहशतवाद्यांना प्रॉक्सीसारखे वापरले, असा आरोप ख्वाजा यांनी केला.

# पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि तात्काळ परत पाठवा

## अमित शाह यांचे सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना निर्देश

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण देशभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादले आहेत. सध्या पाकिस्तान आणि भारतामध्ये तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तसेच भारतीय जवानांकडून दहशतवाद



विरोधी मोहिम राबवण्यात येत आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्रालयाने आता एक मोठा निर्णय घेतला आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी आज (२५ एप्रिल) सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर संवाद साधत पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. तसेच यावेळी गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना महत्वाचे निर्देश दिले आहेत. 'पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि तात्काळ परत पाठवा', अशा सूचना अमित शाह यांनी सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिल्या आहेत.

भारताने पाकिस्तानी नागरिकांसाठी असलेले सर्व व्हिसा सेवा तात्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला २४ एप्रिल रोजी घेतला होता. त्यानंतर आता केंद्रीय गृहमंत्रालयाने मोठा निर्णय घेत पाकिस्तानशी संबंधित सर्व व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील आदेश गृहमंत्रालयाकडून जारी करण्यात आल्याचं वृत्तात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला आहे.

# मजुराचा मुलगा कष्टाने झाला आयपीएस

## देशाची सेवा करण्याचे स्वप्न होणार साकार

**शाहजहांपूर, दि. २५ वृत्तसंस्था**

जिद्द आणि मेहनत करायची तयारी असेल तर स्वप्नं देखील सत्यात उतरतात. अशीच प्रेरणादायी गोष्ट शाहजहांपूरच्या तिलहर शहरातील इमली मोहल्ला येथील रहिवासी शकील अहमद यांची आहे. शकील अहमद यांचे वडील एकेकाळी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मजूर म्हणून काम करायचे. आज त्यांच्या मुलाने आयपीएस होऊन यशाचं शिखर गाठलं आहे. शकील यांनी यूपीएससीमध्ये ५०६ वा रँक मिळवला आहे. मंगळवारी जेव्हा केंद्रीय लोकसेवा आयोगाने नागरी सेवा परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर केला तेव्हा शकील यांच्या कुटुंबाला फार आनंद झाला.

हाजी तसब्बर हुसेन यांना सहा मुलं आणि तीन मुली आहेत. मोठं कुटुंब असल्याने तसब्बर पोटरगंज मार्केटमध्ये काम करायचे. हळूहळू मुलं मोठी झाली आणि त्यांनी कुटुंबाची जबाबदारी



स्वतःवर घेतली. शकील यांचे भाऊ सगीर म्हणाले की, आमच्यापैकी कोणातरी एकाने शिक्षण घ्यावं आणि मोठं नाव करावं हे संपूर्ण कुटुंबाचं स्वप्न होतं.

सर्व भाऊ आणि बहिणी अभ्यास करत होते पण शकील सर्वात हुशार होता. या कारणास्तव सर्वांनी त्याला शिक्षण देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. शकील यांनी तिलहार येथील केंब्रिज स्कूलमधून आठवीपर्यंत शिक्षण घेतलं. त्यानंतर शाहजहांपूरच्या तक्षशिला पब्लिक स्कूलमधून नववी आणि दहावीचं शिक्षण घेतलं. बी.टेक पूर्ण केल्यानंतर शकील दिल्लीला गेले.

शकील यांनी जामिया कॅम्पसमध्ये राहून यूपीएससीची तयारी सुरू केली. त्यांना चौथ्या प्रयत्नात यश मिळालं. दोनदा मुख्य परीक्षेत आणि एकदा मुलाखतीत अपयशी ठरल्यानंतरही शकील यांनी हार मानली नाही. चौथ्या प्रयत्नात ते आयपीएस होण्यात यशस्वी झाले.

शकील यांनी दिल्लीहून फोनवरून आपल्या कुटुंबाला आयपीएस झाल्याचं सांगितलं तेव्हा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. लोकांना माहिती मिळताच, कुटुंबाचं अभिनंदन करण्यासाठी लोकांची त्याच्या घरी रांग लागली. शकीलला नेहमीच देशाची सेवा करायची होती. आज त्याचं स्वप्न पूर्ण झालं आहे असं भाऊ सगीर यांनी म्हटलं.

# लग्नातील जेवणामुळे 51 जणांना विषबाधा

**कोरबा, दि. २५ वृत्तसंस्था**

छत्तीसगडमधील कोरबा जिल्ह्यात एका लग्नातील जेवणामुळे तब्बल ५१ जणांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. जेवल्यानंतर ३७ मुलांसह एकूण ५१ लोक अन्नातून विषबाधा झाल्यामुळे गंभीर आजारी पडले. पोलिसांनी याबाबत माहिती दिली. एका अधिकाऱ्याने सांगितलं की, या सर्व लोकांना कोरबा येथील मेडिकल कॉलेज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. रात्री उरगा पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या पहारीपारा गावात एका लग्न समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं. येथे जेवल्यानंतर काही पाहुण्यांना उलट्या आणि जुलाब झाले. रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गोपाल कंवर यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयात दाखल झालेल्यांमध्ये १४ मुली, २३ मुलं, ११ महिला आणि तीन पुरुषांचा समावेश आहे. अन्नातून विषबाधा होण्याचं नेमकं कारण अद्याप कळलेलं नाही आणि तपास सुरू आहे.

# पाकिस्तानचे स्टॉक एक्सचेंज पडले बंद




**कराची, दि. २५ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाल्याची घटना घटना घडली. या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. भारत सरकारने २३ एप्रिल रोजी भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्यासाठी ४८ तासांची मुदत दिली आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

दोन्ही देशांमधील तणावाचा परिणाम शेअर बाजारावरही झाल्याचं पाहायला मिळत आहे. पाकिस्तानच्या शेअर बाजारही मोठ्या प्रमाणात कोसळल्याचं पाहायला मिळालं आहे. यानंतर पाकिस्तान स्टॉक एक्सचेंजची वेसाईट बंद पडल्याची माहिती समोर आली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाचा फटका पाकिस्तानला बसल्याचं बोललं जात आहे.

पाकिस्तानच्या स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट बंद पडली आहे. पाकिस्तान स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाईटवर 'We'll be back soon.' असा मेसेज दिसत आहे. तसेच पीएसएक्सची वेबसाइट पुढील सूचना मिळेपर्यंत देखभाली खाली असून त्यामुळे वेबसाइट बंद करण्यात आल्याचं म्हटलं आहे. तसेच स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट पुन्हा लवकरच सुरु होणार असल्याचंही म्हटलं आहे.

दरम्यान, पाकिस्तानचा शेअर बाजार आज १०० निर्देशांक (KSE-१००) पहिल्या पाच मिनिटांत दोन टक्क्यांहून अधिक किंवा २,५०० अंकांनी घसरून १,१४,७४०.२९ वर पोहोचला. जरी निर्देशांकाने काही तोटा भरून काढला असला तरी, दुपारी ३ वाजेपर्यंत १,५३२.४२ अंकांनी किंवा १.३१ टक्क्यांनी घसरून ११५,६९३.७२ वर पोहोचला होता.

# हॉकी: आशिया कप वर संकट

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे दहशतवाद्यांनी क्रूरतेचा कळस गाठला. या नवीन घडामोडींमुळे आशिया कपवर सावट उभे ठाकले आहे. हॉकी आशिया कप हा २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर यादरम्यान बिहार येथील राजगीर येथे आयोजित करण्यात आला आहे.

बिहार येथील राजगीरमध्ये आशिया कप होणार आहे. हा कप म्हणजे जागतिक हॉकी फेडरेशनद्वारे घेण्यात येणाऱ्या २०२६ मधील विश्वचषकासाठी पहिली पायरी असते. यामध्ये जे संघ उत्कृष्ट कामगिरी करतात, त्यांची निवड विश्वचषकासाठी करण्यात येते. या महिन्याच्या सुरूवातीला भारतीय हॉकी संघाने या टुर्नामेंटविषयी माहिती दिली होती, त्यानुसार, पाकिस्तान, दक्षिण कोरिया, मलेशिया, चीन आणि जपान हे या स्पर्धेत सहभागी होणार होते.

पाकिस्तानसोबतचे सामने दुसऱ्या एखाद्या ठिकाणी खेळवले जाऊ शकतात. तर येत्या काही महिन्यात जर परिस्थिती सामान्य झाली तर कदाचित हे सामने येथेच खेळवले जाऊ शकतात. सध्या वेट अँड वॉच अशी परिस्थिती आहे. सरकारच्या धोरणानुसार पुढील निर्णय घेण्यात येतील असे स्पष्ट होत आहे.

# सोन्याची मागणी वाढतीच

**अलीकडच्या दोन महिन्याच्या कालावधीत जरी जागतिक स्तरावर शेअर बाजारात वेगवगळ्या कारणांनी प्रचंड पडझड सुरु असली तरी त्याच तुलनेत सोन्याच्या भावात मात्र सातत्याने वाढ होताना दिसतेय. जागतिक स्तरावर सोन्याला बाजारात प्रचंड मागणी असल्यामुळेच सोन्याचा भाव हा दिवसेंदिवस वधारतो आहे. हा भाव सध्या प्रति तोळा १ लाखांच्या घरात गेलेला आहे. याच पार्श्वभूमीवर ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी कौन्सिल चे अध्यक्ष राजेश रोकडे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**१]सोन्याचा भाव हा प्रचंड वधारतो आहे त्यामागचे कारण काय आहे?**

सोन्याचा भाव किरकोळ स्तरावर १ लाखाच्या वर जाऊन आल्यामुळे सोन्याच्या मागणीवर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. मात्र हा परिणाम तात्कालिक असून येत्या काळात सोन्याची मागणी वाढतीच राहणार आहे. मुंबईच्या सराफ बाजारात किरकोळ स्तरावर २४ करेट सोने प्रति १० ग्रॅम १ लाख १ हजार ३५० रुपयांना विकले गेले. २२ कॅरेट सोन्याचा भाव ९२ हजार ९०० रुपये राहिला. या पार्श्वभूमीवर सोन्याची मागणी कायम राहण्यासाठी तसेच ती वाढती राहण्यासाठी ३० एप्रिल ला येणारी अक्षय तृतीया कारणीभूत असणार आहे.

**२]मागील आर्थिक वर्षात सोन्याच्या आयाती बाबत काय स्थिती होती?**




**साप्ताहिक संवाद**

आर्थिक वर्ष २०२३ आणि २०२४ मधील सोन्याच्या आयातीची आकडेवारी तपासायची म्हटली तर,२०२३ या वर्षात ७४१ टन सोने आयात केले गेले. २०२४ या यावर्षात ८०२ टन सोन्याची आयात झालेली आहे. त्याचवेळी सोन्याचा भाव हा २५ ते ३० टक्के अधिक होता. २०२४ यामध्ये सोन्याचा भाव सातत्याने बदलत राहिला आणि आता यंदाच्या वर्षी वाढत्या मागणीमुळे सोने १ लाखाच्या वर गेले आहे.

**३]भविष्यकाळात सोन्याच्या विक्री बाबत काय स्थिती असेल?**

ग्राहकाकडून सोने खरेदी करण्याला प्रचंड सकारात्मक प्रतिसाद असल्यामुळे भविष्यकाळात सोन्याच्या भावात अशीच वृद्धी होत राहणे अपेक्षित आहे .त्याचवेळी सोन्याची मागणी देखील सतत वाढत राहणार आहे. लग्नसराईचा काळ असेल,आपले विविध सण आणि उत्सव लक्षात घेता ग्राहकांकडून सोन्याची मागणी हि वाढतच राहणार आहे. त्यामुळे सोन्याचा सराफ बाजार हा भविष्यात तेजीत असेल यात शंका नाही.


# भारतीय व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर - सॅप नाऊचे सर्वेक्षण

**लोकरंग**

मुंबईतील सॅप नाऊ एआय टूरमध्ये, सॅप इंडियाने भारतीय व्यवसायांना कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) कसा फायदा होत आहे याचे नवीन विश्लेषण उघड केले. एआय प्रचारापासून वास्तविक-जगातील प्रभावाकडे वाटचाल करत, भारतीय उद्योग व्यवसाय ऑपरेशन्समध्ये एआय उपायांचा अवलंब करत आहेत, ज्यामुळे २०२५ हे मोजता येणारे एआय परिणामांचे वर्ष बनले आहे.एंटरप्राइझ ॲप्लिकेशन्स आणि बिझनेस एआय मध्ये आघाडीवर असलेली सॅप या वर्षी बाजार भांडवलीकरणाच्या बाबतीत युरोपमधील सर्वात मोठी कंपनी बनली. १९९६ मध्ये स्थापन झाल्यापासून, सॅप इंडियन ऑपरेशन्सने विविध क्षेत्रांमध्ये वाढ आणि नवोपक्रमांना पाठिंबा देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

**दखल**

महिंद्रा अँड महिंद्रा, एशियन पेंट्स, विप्रो लिमिटेड, इन्फोसिस लिमिटेड, वाहदम टीज, ओला, वेकफिट, देहात, जक्वार आणि इतर अनेक आघाडीच्या संस्थांसोबत भागीदारी करून, त्यांनी देशभरात




लक्षणीय आर्थिक प्रभाव पाडण्यास मदत केली आहे. मार्च २०२४ ते मार्च २०२५ या १२ महिन्यांच्या कालावधीत भारतातील सॅप ग्राहकांच्या विश्लेषणावर आधारित, भारतातील सर्वात लोकप्रिय एआय वापर प्रकरणे आहेत: एआय-व्युत्पन्न दृश्य अंतर्दृष्टी, सारांश आणि भाषांतरे, एआय-सहाय्यित प्रक्रिया विश्लेषण,असंरचित डेटामधून विक्री ऑर्डर तयार करणे,भाकित अंदाज,नैसर्गिक भाषा प्रश्न.

# धार्मिक महत्व असलेले पंचवटी

नाशिक शहराला खूप मोठा इतिहास आहे नाशिक जिल्ह्याला महान पौराणिक पार्श्वभूमी आहे. भगवान राम आपल्या वनवासा दरम्यान पंचवटी येथे वास्तव्य करीत होते आणि त्यांनी आपल्या वनवासाचा बराच काळ इथे घातला. त्यानंतर अगस्ती ऋषी तपस्यासाठी नाशिकमध्ये राहिले होते , गोदावरी नदी चा उगम सुद्धा नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथुन उगम पावते. बारा ज्योतिर्लिंग पैकी एक त्र्यंबकेश्वर शिव मंदिर त्र्यंबक नाशिक येथेच आहे. नाशिक ला ऐतिहासिक वारसा सोबत नाशिक ने काही भारताला अनेक प्रसिद्ध व्यक्तीमत्व सुद्धा दिले आहेत. ज्यामध्ये वीर सावरकर, अनंत कान्हेरे, लोकमान्य टिळक, दादासाहेब पोतनीस, बाबूभाई राठी, व्ही. व्ही. शिरवाडकर आणि वसंत कानेटकर हि काही प्रसिद्ध नावे आहेत. नाशिकला मिनी महाराष्ट्र असेही म्हणतात, नाशिक ची ओळख सर्वात जास्त इथल्या धार्मिक पार्श्वभूमी वरून आहे, ह्या शहरातील महत्वाचे



पर्यटन स्थळ जिथे तुम्ही नक्की भेट दिली पाहिजे.नाशिक शहरामध्ये मध्यभागी ठिकाणी पंचवटी हा परीसर आहे आणि हा गोदावरी नदीच्या डाव्यातीरावर आहे. इथेच सुप्रसिद्ध काळाराम मंदीर आहे, आणि त्याला काळाराम मंदिर जवळ ५ वटवृक्षांचा समुह आहे हा समुह पाच वटवृक्षांपासून तयार झाला असल्या मुले ह्या परिसरास ' पंचवटी ' असे संबोधले जाते. ह्याचा अर्थ 'पंच' म्हणजे पाच व 'वटी' म्हणजे वडाचे झाड असा आहे.ह्या परिसरात आपल्याला खूप मंदिरे बघायला मिळतात काळाराम मंदिर, कपालेश्वर मंदिर, गंगा-गोदावरी मंदिर, सुंदर नारायण मंदिर, टाळकुटेश्वर मंदिर, निळकंठेश्वर मंदिर, गोराराम मंदिर, मुरलीधर मंदिर, तिळभांडेश्वर मंदिर, बालाजी मंदिर, सांडव्याची देवी मंदिर, विठ्ठलमंदिर, पाताळेश्वर मंदिर, नारोशंकर मंदिर, रामकुंड, दुतोंडया मारुती, कार्तिकस्वामी मंदिर, काटयामारुती मंदीर, पंचमुखी हनुमान मंदिर, भद्रकाली मंदिर, कपुरथळा स्मारक अशी अनेक मंदिरे पंचवटी व सभोवतालच्या परिसरामध्ये गोदावरी नदीच्या दोन्ही तीरांवर आहेत. या मंदिरांमुळेच नाशिकला ''पश्चिम भारताची काशी ''असे म्हटले जाते.

**चला पर्यटनाला**

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# सीमा पाकिस्तानला परत जाणार नाही

## केंद्राच्या निर्बंधांनंतरही वकिलांनी मांडली भूमिका

**नोएडा, दि. २५ वृत्तसंस्था**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतासह जगभरातल्या देशांकडून पाकिस्तानच्या कृत्याचा निषेध केला जात आहे. या हल्ल्यामध्ये पाकिस्तानचा हात असल्याचं स्पष्ट झाल्यानंतर भारत सरकारनं पाकिस्तानवर मोठ्या प्रमाणावर निर्बंध लादले आहेत. त्यात पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेशबंदी करण्याबरोबरच भारतात असणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ताबडतोब देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर दोन वर्षांपूर्वी पाकिस्तानातून भारतात पळून आलेल्या सीमा हैदरचं काय होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यावरून देशभरात संताप व्यक्त होत असून पाकिस्तानला धडा शिकवण्याची भावना देशवासीयांकडून व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात पहिलं पाऊल म्हणून भारत सरकारने पाकिस्तानवर निर्बंध लादले आहेत. केंद्र सरकारने सर्व राज्य



सरकारांशी संपर्क साधून त्या त्या राज्यात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांची यादी करून त्यांना परत पाठवण्याचे आदेश दिले आहेत. त्यात सीमा हैदरचीही परत पाठवणी होणार का? असा प्रश्न उपस्थित होत असताना तिच्या वकिलांनी त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे.

२०२३ साली सीमा तिच्या चार मुलांसह हैदर पाकिस्तानातून नेपाळमार्गे भारतात पळून आली होती. पाकिस्तानात पती गुलाम हैदरच्या छळाला कंटाळून सीमा भारतात आली. ग्रेटर नोएडामध्ये राहणारा प्रियकर सचिन मीनाबरोबर सीमानं हिंदू पद्धतीने विवाह केला. पण भारतीय कायद्यानुसार सीमा हैदरनं भारतात बेकायदेशीररीत्या प्रवेश केला असल्याचा आरोप करण्यात आला. त्यानुसार तिच्या नागरिकत्वासंदर्भातला खटला अद्याप न्यायालयात प्रलंबित आहे

# भारताने अरबी समुद्रात तैनात केले आयएनएस विक्रांत



**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, भारताने पाकिस्तान विरोधात कठोर पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून आता भारताने स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत अरबी समुद्रात तैनात केली आहे. पाकिस्तानसोबत वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे. कारण पाकिस्तान याच भागात क्षेपणास्त्र चाचणीची तयारी करत असल्याचे वृत्त आहे.

संरक्षण विश्लेषकांना मिळालेल्या उपग्रह छायाचित्रांवरून, स्पष्ट झाले आहे की, आयएनएस विक्रांतने बंदर सोडले असून, जहाज सध्या कर्नाटकातील कारवार किनाऱ्याजवळ गस्त घालत आहे. पहलगाममध्ये झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर नौदलाने उपस्थिती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत टाइम्स नाऊ ने वृत्त दिले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, पाकिस्तानच्या सागरी सीमेजवळ आयएनएस विक्रांतची तैनाती या प्रदेशात वर्चस्व गाजवण्याची भारताची तयारी असल्याचे स्पष्ट होते.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा पाकिस्तानस्थित द रेझिस्टन्स फ्रंटशी थेट संबंध असल्याने, भारताने सिंधू पाणी करार स्थगित केला. याचबरोबर भारतातील पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्याचे आदेशही दिले आहे. तसेच अटारी वाघा सीमा बंद करण्याचाही निर्णय घेतला आहे.

# "माझ्यासाठी राष्ट्र प्रथम", अर्शद नदीमला भारतात बोलावण्यावरून होत असलेल्या टीकेवर नीरज चोप्राची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था**

भारताचा अव्वल भालाफेकपटू नीरज चोप्रा याने पाकिस्तानचा ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू अर्शद नदीम याला भारतात आयोजित एनसी क्लासिक स्पर्धेचं निमंत्रण पाठवलं होतं. त्यावरून नीरजवर टीका होत होती. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यादरम्यान नीरजच्या निमंत्रणाची बातमी समोर आल्यामुळे नीरजवर अनेकांनी समाजमाध्यमांवरून टीका केली होती. या प्रकरणावर आता नीरजने मौन सोडलं आहे. नीरजने देखील समाजमाध्यमावर एक पोस्ट करून त्याचं म्हणणं मांडलं आहे. तसेच त्याच्या देशभक्तीवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांवर संताप व्यक्त केला आहे.

नीरज म्हणाला, "अर्शद नदीमला निमंत्रित केल्याबद्दल माझ्या कुटुंबावर टीका केली जात आहे. आमच्याबद्दल द्वेष पसरवला जातोय, अपप्रचार केला जातोय. हे मी कधीच सहन करणार नाही. माझ्यासाठी नेहमी राष्ट्रपथम होते आणि



आहे. मी कमी बोलणारा माणूस आहे. याचा अर्थ असा नव्हे की माझ्या कुटुंबाबद्दल, देशाप्रती माझ्या मनात असलेल्या प्रेमावर कोणी प्रश्न उपस्थित केले तर मी बोलणारच नाही."

भालाफेक स्पर्धेत भारतासाठी दोन ऑलिम्पिक पदकं पटकावणारा नीरज चोप्रा म्हणाला, "मी अर्शदला एनसी क्लासिक स्पर्धेसाठी निमंत्रण दिलं हे एका खेळाडूने दुसऱ्या खेळाडूला दिलेलं निमंत्रण होतं. याचे वेगळे अर्थ काढू नये. जगभरातील सर्वोत्तम खेळाडू भारतात आणणे हे एनसी क्लासिकचं मुख्य उद्दीष्ट आहे. आपण यंदा या विश्वस्तरीय स्पर्धेचं आयोजन करत आहोत. पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्याच्या दोन दिवस आधी मी अर्शदला एन. सी. क्लासिक स्पर्धेचं निमंत्रण पाठवलं होतं. पुढच्या ४८ तासांत अशा काही घटना घडल्या की त्यानंतर अर्शदला भारतात निमंत्रित करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जिथे देशाच्या हिचाचा विषय असेल तिथे मी सर्वात पुढे उभा असेन.

नीरज म्हणाला, "मी माझ्या देशासाठी खेळतो, माझ्या देशाचं नाव उंचावण्यासाठी काम करतो. तरी देखील माझ्या ईमानदारीवर संशय उपस्थित केला जात आहे. हे सगळं पाहून मला खूप दुःख झालं आहे. काही लोक माझ्या कुटुंबावर निशाणा साधतायत. मला त्यांना सांगावं लागतंय की आम्ही सामान्य लोक आहोत. दुसऱ्या बाजूला, प्रसारमाध्यमांतील काही लोक माझ्या नावाने वेगवेगळ्या खोट्या गोष्टी पसरवत आहेत. मी त्यावर काही बोललो नाही, बोलत नाही याचा अर्थ असा नाही की ते सगळं खरं असेल.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com